नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २०२ * * अकोला * | शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## जेकेच्या कठुआमध्ये जैशचा दहशतवादी ठार

■ वृत्तसंस्था, कठुआ, दि. २३ :

जम्मू-काश्मीरमधील कठुआ येथे शुक्रवारी दुपारी सुरक्षा दलांनी पाकिस्तानच्या जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या दहशतवाद्याला ठार केले. बिलावर परिसरात अजूनही दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे. आयजीपी जम्मू यांनी दहशतवादी ठार झाल्याची पुष्टी केली आहे.

किश्तवाडमधील तरू पट्ट्यात मंडराल-सिंहपोरा जवळील सोनार गावाच्या जंगलात 'ऑपरेशन त्राशी-१' सुरू आहे. येथेही जैशचे २-३ दहशतवादी लपून बसल्याची शक्यता आहे. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी लष्कर, पोलिस आणि निमलष्करी दलाचे अनेक पथके परिसरात तैनात आहेत. ड्रोन आणि स्निफर डॉग्सच्या मदतीने जंगलात शोध घेतला जात आहे.

## हायकोर्टाचा सुपर झटका




न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेतली आणि निवार्णीचा इशारा दिला की, मग मोठ्यात मोठ्या हुद्द्यावर असलेल्या आरोपींची नांगी आपोआप सैल होते. त्यानंतर तो आरोपी विनाशर्थ कसा शरण येतो त्याचे एक वेगळे उदाहरण आज दिसले आहे. काल उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जामदार यांच्या एकलपीठाने एका मंत्री पुत्राबद्दल सर्वांनाच खडसावले. तो सर्रास बाहेर फिरतो पण पोलिसांना तो दिसतच नाही असे स्पष्टपणे घोषित केल्यावर आज तेच मंत्रीपुत्र महाशय न्यायालयाच्या आदेशाने पोलीस शरण आले. तसेही ते फरार नव्हतेच आणि आपल्या शूर पोलिसांना त्यांना पकडणे कठीणही नव्हते. पण पोलीस विभागाला सुद्धा मागचे-पुढचे पाहून कुठे स्टील सारखे कठोर तर, कुठे रुईसारखे मऊ व्हावे हे बरोबर समजते. आता न्यायालयाने धारेवर धरल्यावर ते तरी काय करणार. मग पोलिसांनी धरून पकडून आणण्यापेक्षा आपण गपगारपणे पोलिसांच्या स्वाधीन होणे हेच उत्तम आहे असे त्या मंत्र्याच्या पुत्राला वाटले असावे. निवडणुकीच्या कालावधीत त्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे नोंदवले गेलेले आहेत. पाठलाग, हाणामारी, पिस्तुल सारख्या प्राणघातक शस्त्राचा धाक असे या गुन्ह्यांचे स्वरूप आहे. निवडणुकीच्या वेळी महाड येथे युतीमधल्याच दोन पक्षांमध्ये फार मोठा राडा झाला होता. ते दोन्ही पक्ष सरकार मध्ये सामील आहेतच. मात्र ज्याच्या नावाने दुंदुभी वाजली केवळ तोच पोलिसांना शरण आला नाही. तर दुसरा पक्षही शहाजोगपणे पोलिसांच्या डे?यात दाखल झाला आहे. आम्हाला अशा थिल्लर वागणुकीचा मनस्वी तिटकारा आहे. जे शब्दाने होऊ शकते अशा प्रकारासाठी तलवारीच्या उपयोगाची गरजच काय. मात्र सध्या मंत्र्यांपेक्षा मंत्रीपुत्र केव्हाही भारी असतात. कारण मंत्र्याला निवडून यायचे असल्यामुळे अनेकदा नमते घ्यावे लागते आणि त्यांच्या पुढच्या पिढीला त्याची गरज नसते. त्यामुळे जोपर्यंत गरज नाही, तोपर्यंत पडलो तरी टांग वर असाच त्यांचा खाक्या असतो. पण सध्या हे पुत्र कधी पडतच नाहीत कारण त्यांच्या मागे अनेक मंत्र्यांच्या भक्तगणांची आणि असंख्य शिष्यगणांची फौज सदैव उभी असते. सत्ता आहे म्हणून ही फौज आपल्यामागे उभी आहे हे त्यांनाही ठावूक असते. त्याबरोबर ही सत्ता अखंड राहील अशा आत्मविश्वासामुळे वरील प्रकारासारखे प्रकार घडत असतात. आपल्या मुंबई उच्च न्यायालयाचे विद्वान न्यायाधीश जामदार साहेब किती न्यायप्रिय आणि खमके आहेत हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. न्यायालयात गेल्यावरती सामान्य ते अति महत्त्वाच्या व्यक्तीपर्यंत सर्वांना समान न्याय असतो. हा समानतेचा धागा दिसल्यामुळे एक दिवसाचाही विलंब न करता हे लंबकर्ण मंत्रीपुत्र आपले नाक मुठीत धरून शरणागत आले असावेत. हे सर्व आपल्या महाराष्ट्रात शक्य आहे कारण मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीतील गृहखाते याबाबतीत कडक कारवाई करणार आहे. हे दिसल्यामुळे त्या खात्याला फारशी मेहनत न घेताही आरोपी चालत येऊन त्यांच्या जाळ्यात पडलेले आहेत. राज्यात या आधीच शेकडो प्रश्न समोर उभे असताना अशा निष्कारण वादावादीसाठी सरकारची बदनामी करण्यापेक्षा जो दोषी आहे त्याची मानगुट पकडणे केव्हाही योग्य असते. त्यामुळेच हा न्यायालयीन दट्ट्याचाच परिणाम आहे यात शंका नाही.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही...
# महापौर महायुतीचाच !

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :



आम्हाला कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही. मुंबईत शिवसेना - भाजप महायुतीचाच महापौर होत आहे, असे ते म्हणालेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी सत्ताधारी एकनाथ शिंदे यांना मुंबईच्या महापौरपदासाठी ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. यावर शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

आजपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. या ऐतिहासिक वर्षात मुंबई महापालिकेवर भगवा फडकवावा व शिवसेनेचाच महापौर व्हावा अशी आग्रही मागणी शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे. पण भाजपने ८९ जागांसह महापौर पदावर आपला हक्क सांगितल्यामुळे पेच निर्माण झाला आहे. त्यातच भास्कर जाधव यांनी एकनाथ शिंदे यांना मुंबई महापालिकेत ठाकरेंच्या महापौरपदाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंनी वरील भूमिका व्यक्त केली आहे.

शिंदे यांनी आज बाळासाहेबांना अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, कोणता प्रस्ताव, काय प्रस्ताव? आम्हाला कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही. मुंबईत शिवसेना - भाजप महायुतीचा महापौर होत आहे. भाजप व शिवसेना ही आताची युती नाही. ती बाळासाहेब, अटलजी व अडवाणींच्या काळातील युती आहे. एनडीएमध्ये आम्ही सोबत आहोत. महायुतीमध्ये सोबत आहोत. त्यामुळे विचारधारेबरोबर आम्ही आहोत.

ते पुढे म्हणाले, मुंबईत महायुतीचाच महापौर बसेल. आमची युती आहे. त्यांच्यासारखी याला खड्ड्यात घाल, त्याला खड्ड्यात घाल अशी युती नाही. खुर्ची व सत्ता हा आमचा अजेंडा नाही. आम्ही मुंबईकरांना काय देणार हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण, मुंबईकरांनी आमच्यावर विश्वास टाकला आहे.

आता या ५ वर्षांत आम्ही मुंबई जागतिक पातळीवरील शहरासारखी करणार. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईला फिनटेक कॅपिटल करण्याचा शब्द दिला आहे. त्यानुसार, मुंबई हे जागतिक आर्थिक केंद्र झाले पाहिजे. पण विरोधकांनी लगेचच मुंबईला तोडण्यात येणार असल्याची ओरड करण्यात आली. पण मराठी माणूस तुमच्यामुळे मुंबईबाहेर फेकला गेला.

मुंबईकरांना जीवनात काय मिळणार हा आमचा अजेंडा आहे. आता मनसेही आमच्यासोबत येत आहे. मनसेने विकासाच्या मुद्यावर आम्हाला साथ दिली. आमच्यात महापौरपदासाठी कोणतीही रस्सीखेच नाही. बहुमत नसणाऱ्यांनी स्वप्ने पाहणे चुकीचे आहे, असे शिंदे म्हणाले.

## ..यापेक्षा चांगले काहीच नाही : राज ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :



बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने श्री षण्मुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे पुन्हा एकदा एकाच मंचावर आलेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोवाडाच्या माध्यमातून महाराष्ट्रातली परिस्थिती तसेच शिवसेना पक्षात घडलेल्या घडामोडींवर भाष्य करत शिंदे गट तसेच भाजपवर टीका करण्यात आली.

मनसे प्रमुख राज ठाकरे यावेळी म्हणाले, आज बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. आज सामनामध्ये मी लेख लिहिला आहे, त्यात अनेक आठवणी मी लिहिल्या आहेत. खरे तर त्या व्यक्तीला कसे मांडायचे हे प्रश्न माझयासमोर उभे राहतात, काका म्हणून मांडायचे, व्यंगचित्रकार म्हणून मांडायचे की काय.. त्यांचे अनेक किस्से हे न सांगण्यासारखे आहेत. तुम्हाला माहीत नाही काय होते ते, तुम्हाला फक्त भाषणातून झलक दिसली आहे.

ते पुढे म्हणाले, आज महाराष्ट्राची जी परिस्थिती झाली आहे म्हणजे गुलामांचा बाजार. आजची परिस्थिती बघून मला असे वाटत आहे की बाळासाहेब आज नाहीत तेच बरे आहे. काय त्रास झाला असता त्या माणसाला. कुठे नेतोय आपण? आज ही परिस्थिती बघायला बाळासाहेब नाहीत यापेक्षा चांगली गोष्ट नाही. ज्या गोष्टी शून्यातून उभ्या केल्या.बाळासाहेब ठाकरे कसर होता हे जगाला कळलेच नाही. आम्ही घरातले असून आम्हाला कळले नाहीत, तुम्हाला कुठून कळणार? असेही राज ठाकरे यावेळी बोताना म्हणाले.

# शहरात तीन खून
# उपराजधानी हादरली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

महानगरपालिका निवडणुका आटोपताच शहरात गुन्हेगारीने पुन्हा डोके वर काढले असून, गुरूवारी दुपारी एका तरूणीची हत्या झाली तर रात्री उशिरा दोन घटनांमध्ये दोन तरूणांचा खून करण्यात आला. हत्येच्या तीन घटनांनी उपराजधानी पुरती हादरून गेली आहे.

### अल्पवयीन मुलाकडून तरुणाची हत्या

श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या कार्यक्रमानंतर झालेल्या वादातून एका १७ वर्षीय मुलाने भाजी कापण्याच्या चाकूने वार करून तरुणाचा खून केल्याची घटना घडली. गुरुवारी रात्री ११.१५ वाजताच्या सुमारास बेसा - मानेवाडा रोडवरील अजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटनेने तणाव निर्माण झाला होता.

योगेश अनिल काकडे, रा. श्रीकृष्णनगर असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार, आरोपी अल्पवयीन मुलगा पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) कामासाठी मजुरी करतो. गुरुवारी श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सवानंतर आरोपी व योगेश काकडे यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. आरोपीने मद्यपानावर सुमारे १,१०० रुपये खर्च झाल्याचे सांगत ते पैसे परत देण्याची मागणी योगेशकडे केली. मात्र या मागणीवरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. योगेश काकडे यांनी आरोपीला मारहाण केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.



आरोपीने मारहाण थांबवण्याची विनंती केली. मात्र योगेश त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत मारहाण सुरूच ठेवत होता. त्यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने त्याच्या कमरेत लपवून ठेवलेला भाजी कापण्याचा चाकू काढत योगेशच्या छातीवर आणि कमरेखाली दोन वार केले. योगेशने आरडा- ओरड केली. त्यानंतर आरोपी तेथून पसार झाला. दरम्यान घटनास्थळी बघ्यांची गर्दी जमली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. उपस्थितांपैकी काहींनी पोलिसांच्या मदतीने गंभीर जखमी झालेल्या योगेश काकडेला तातडीने रुग्णालयात हलवले. परंतु योगेशचा मृत्यू झाला.

माहिती मिळताच अजनी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी काही तासांतच आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणी अजनी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर बाल न्याय कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

### पैशाच्या वादातून तरुणाचा खून

पैशाच्या जुन्या वादातून गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३८ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. हर्ष ऊर्फ गड्डू शिवानंदन पांडे (३८), रा. कामगार नगर, असे मृत तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्ष पांडे हा गुरुवारी रात्री आपल्या मित्रासोबत मिलन ऊर्फ बंटी विनायक वानखेडे (३६) याच्यासह बाहेर गेला होता. दोघेही पोलिस लाईन टाकळी येथील पिवळ्या इमारतीजवळ, क्वार्टर क्रमांक ४१६/१५ जवळ उभे असताना पांडेला एक फोन आला. फोनवर बोलण्यासाठी तो थोडा दूर गेला असता, तेथे आधीच्या वादातून बंटी ऊर्फ बुरहान शेख (रा. आवस्थी नगर चौक, पानटपरी चालक) हा आपल्या साथीदारांसह दुचाकीवरून तेथे आला. शेख व त्याच्या साथीदारांनी पांडेला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि धारदार शस्त्राने डोक्यावर वार करून गंभीर जखमी केले.

घटनेनंतर आरोपी फरार झाले. गंभीर अवस्थेत पांडेला मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मृताच्या मित्राच्या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल केला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

मृतक हर्षू पांडे याने काही दिवसांपूर्वी अवस्थीनगर चौकातील बंटी शेख याचेकडून १० हजार रुपये उधार घेतले होते. बंटी हा पानठेला चालवितो. गुड्डूने पैसे घेऊन बरेच दिवस झाले, तरी तो पैसे परत करत नव्हता. यावरून त्यांच्यात अनेकदा वाद झाला होता. याच वादातून बंटी शेख याने हर्ष पांडे याची हत्या केल्याचे समोर आले आहे.

### ओयो हॉटेलमध्ये तरुणीची हत्या



कळमेश्वर रोडवरील फेटरी गावाजवळील एका ओयो हॉटेलमध्ये तरुणीची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना आज शुक्रवारी सकाळी उघडकीस आली आहे. ही घटना गुरुवारी दुपारी अडीच ते साडे तीनच्या दरम्यान घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले असून, या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

रुचिका राजेश भांगे (२१) रा. वेलकम सोसायटी, बोरगाव असे मृत प्रेयसीचे नाव असून, सौरभ शिवदास जामगडे (२६) रा. आष्टी असे आरोपीचे नाव आहे.

रुचिका ही धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये शिकायची तर सौरभ डाटा एन्ट्री ऑपरेटर आहे. मागील दोन वर्षांपासून त्यांच्यात प्रेमसंबंध होते. रुचिका ही पोलीस भरतीची तयारी करीत असल्याने ती पोलिस लाईन टाकळी येथे सरावासाठी जात होती. तरुण मुलांसोबत ती सराव करण्यास सौरभ तिला मज्जाव करायचा. परंतु, मुले आणि मुली एकत्र सराव करीत असल्याने रुचिका त्याचे ऐकत नव्हती. त्यामुळे रुचिकाचे दुसऱ्या मुलासोबत संबंध असल्याचा सौरभला संशय होता.

दरम्यान, गुरूवारी सौरभने रुचिकाला फोन करून फिरायला जाण्यास कळविले. दोघेही आपापल्या दुचाकीने गुरुवारी दुपारी २.३० च्या सुमारास नागपूर नजिकच्या फेटरी येथील ओयो हॉटेलमध्ये गेले. त्यांनी एक खोली बुक केली. खोलीत गेल्यानंतर त्यांच्यात वाद सुरू झाला. रिसेप्शनिस्टने हस्तक्षेप करून दोघांना समजावले. यावेळी युवकाने पुढे कोणताही वाद होणार नाही, असे आश्वासन दिल्याने परिस्थिती तात्पुरती शांत झाली.मात्र, काही वेळानंतर आरोपी युवकाने पुन्हा तरुणीशी वाद घालत तिच्या गळ्यावर चाकूने वार केला. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली आणि प्रचंड रक्तस्रावामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी सकाळी हॉटेलचा नोकर त्यांच्या खोलीकडे गेला होता. नोकराने बेल दाबली परंतु, आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. हॉटेलच्या व्यवस्थापकाने दार उघडले असता रुचिका रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. लगेच ही माहिती कळमेश्वर पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच ठाणेदार मनोज काळबांडे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. कळमेश्वर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून सौरभचा शोध सुरू केला आहे.

## काँग्रेसच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

जि. प., पं. स. निवडणूक

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने शुक्रवारी आपल्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. या यादीत अल्पसंख्याक समाजातील नेत्यांना १० नेत्यांना स्थान देण्यात आले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत अल्पसंख्यांक विशेषतः मुस्लिम समाजाने एमआयएमला साथ दिल्याचे दिसून आले. त्यामुळे काँग्रेसने जिल्हा परिषद निवडणुकीत मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांना स्टार प्रचारक म्हणून झुकते माप दिल्याची चर्चा आहे. २७ जानेवारीला अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर येत्या ५ फेब्रुवारीला जिल्हा परिषदेसाठी मतदान होत आहे.

काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुकुल वासनिक, बाळासाहेब थोरात, रजनी पाटील, माणिकराव ठाकरे, नाना पटोले, राज्यसभा सदस्य इम्रान प्रतापगढी, चंद्रकांत हंडोरे, नसीम खान, यशोमती ठाकूर, प्रणिती शिंदे, अमीन पटेल, डॉ. नितीन राऊत, अमित देशमुख, विश्वजित कदम, अनिस अहमद, रमेश बागवे, हुसेन दलवाई, साजिद खान पठाण, वसंत पुरके, धीरज देशमुख, रामहरी रुपनवर, एम. एम. शेख, वजाहत मिर्झा, अतुल लोंढे, सिद्धार्थ हत्तीअंबिरे, यशपाल भिंगे, मुफ्ती हारुन नदवी, शाह आलम शेख, संध्या सव्वालाखे, शिवराज मोरे, विलास औताडे, सागर साळुंखे, अक्षय राऊत आणि हनुमंत पवार यांचा समावेश आहे.

## भात घोटाळ्यातील आरोपीचे रूग्णालयात उपचारादरम्यान निधन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार दौलत दरोडा यांचे पुतणे हरीश दरोडा यांचे निधन झाले. कथित भात खरेदी घोटाळ्याच्या प्रकरणात ते सध्या न्यायालयीन कोठडीत होते. तुरुंगात असतानाच त्यांची प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

हरीश दरोडा हे आदिवासी विकास महामंडळाच्या भात खरेदी घोटाळ्याप्रकरणी अटकेत होते. गेल्या काही काळापासून ते या प्रकरणात तुरुंगात होते. अटकेच्या काही काळ आधीच त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार गटात मोठ्या थाटामाटात पक्षप्रवेश झाला होता.

तुरुंगात असताना हरीश दरोडा यांना अस्वस्थ वाटू लागले. तुरुंग प्रशासनाने त्यांना तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

# स्कूल व्हॅनमध्ये चिमुकलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

बदलापूर पश्चिम परिसराताच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. या धक्कादायक घटनेनंतर प्रशासन अखेर खडबडून जागं झालं असून, कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयाने संबंधित स्कूल व्हॅनवर कठोर कारवाई केली आहे.

तपासादरम्यान समोर आलेली माहिती आणखी गंभीर असून, ज्या व्हॅनमध्ये ही घटना घडली ती व्हॅन कोणतीही वैध परवानगी नसताना विद्यार्थ्यांची वाहतूक करत असल्याचं उघड झालं आहे. या गंभीर निष्काळजीपणाची दखल घेत फळड ने संबंधित व्हॅनचा परवाना रद्द केला असून २४ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

ही घटना बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी शाळेत शिकणाऱ्या चार वर्षांच्या चिमुकलीसोबत घडली. दुपारी शाळा सुटल्यानंतर ती स्कूल व्हॅनमधून घरी निघाली होती. मात्र, ठरलेल्या वेळेत ती घरी न पोहोचल्यामुळे आई चिंतेत पडली. वारंवार फोन केल्यानंतर सुमारे दीड तास उशिरा चिमुकली घरी परतली.

ती अत्यंत घाबरलेली, शांत आणि अस्वस्थ अवस्थेत होती. आईने विचारपूस करताच, व्हॅन चालकाने तिच्या गुप्तांगाला हात लावल्याची धक्कादायक माहिती चिमुकलीने दिली. हे ऐकताच कुटुंबीयांनी तत्काळ पोलिस ठाण्यात धाव घेतली.

पालकांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधित स्कूल व्हॅन चालकाला अटक केली. आरोपीविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे बदलापूरसह कल्याण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत कल्याण आरटीओने संबंधित स्कूल व्हॅनची चौकशी सुरू केली. ही स्कूल व्हॅन कोणतीही अधिकृत परवानगी न घेता विद्यार्थ्यांची वाहतूक करत होती. आरटीओने व्हॅनचा परवाना रद्द केला आणि २४ हजार रुपयांचा दंड ठोठावला. मुलांच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**स्कूल व्हॅनची तोडफोड करण्याचा प्रयत्न**

दरम्यान, अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची बातमी समजताच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या महिला कार्यकर्त्यांनी बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात धाव घेतली. यावेळी वातावरण प्रचंड तणावपूर्ण झालं होतं. राष्ट्रवादीच्या नेत्या संगीता चेंदवणकर यांनी संबंधित स्कूल व्हॅनची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला.

काही काळासाठी परिसरात गोंधळाचं आणि तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं, मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेमुळे शाळा व्यवस्थापन, स्कूल व्हॅन चालक आणि प्रशासन यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

## अन्यथा महागात पडेल.. सपकाळ



बदलापूरमध्ये एका लहान मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराने महाराष्ट्राच्या अब्रूची पुन्हा एकदा वेशीवर लक्तरे टांगली आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली. राज्यात कायदा-सुव्यवस्थेची संपूर्णपणे वाताहत झाली असून, देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला लाभलेले सर्वात निष्क्रीय, अकार्यक्षम आणि बेजबाबदार मुख्यमंत्री असल्याचा घणाघाती आरोप त्यांनी केला.

**गृहविभागाचा धाक उरलेला नाही**



बदलापूरमधील बालिकेवरील अत्याचाराच्या घटनेवर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधारी भाजपवर थेट आरोप केले. ही बालिकेवरील अत्याचाराची दुसरी घटना असल्याचं सांगत त्यांनी पहिल्या प्रकरणातील आरोपीला भाजपकडून संरक्षण देण्यात आलं, असा गंभीर आरोप केला.

याआधीच्या प्रकरणातील आरोपीला स्वीकृत नगरसेवक बनवण्यात आलं होतं, ही बाबच सत्ताधाऱ्यांची मानसिकता दाखवते, असं ते म्हणाले. अशा घटनांमुळे पोलिसांचा धाक संपला आहे, गृहविभागाचाही धाक उरलेला नाही, अशी कठोर टीका त्यांनी केली.

## मंत्रीपुत्र विकास गोगावले पोलीस ठाण्यात हजर

उच्च न्यायालयाच्या शब्दांचा परिणाम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :



महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या गाजलेल्या राडा प्रकरणात आज महत्त्वाची घडामोड घडली असून, मुख्य आरोपींपैकी एक असलेले विकास गोगावले हे अखेर महाड पोलिस ठाण्यात हजर झाले आहेत.

कालच या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने आरोपींना अटक न झाल्याबाबत राज्य सरकारवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र असलेले विकास गोगावले यांच्यासह इतर आरोपी मोकाट असल्याने न्यायालयाने सरकारची भूमिका संशयास्पद असल्याचं स्पष्टपणे नमूद केलं होतं. न्यायालयाच्या या कठोर निरीक्षणानंतर अवघ्या २४ तासांत विकास गोगावले पोलिस ठाण्यात हजर झाल्याने या प्रकरणाला नवं वळण मिळालं आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने काल सुनावणीदरम्यान सरकारला अक्षरशः धारेवर धरलं होतं. मुख्यमंत्री इतके असहाय्य झाले आहेत की त्यांना काहीच करता येत नाही, अशा शब्दांत न्यायालयाने संताप व्यक्त केला होता. अटक करायची असेल तर २४ तासांत कोणालाही अटक होऊ शकते, पण अटक करायची नसली की प्रतिज्ञापत्रं सादर केली जातात, अशी बोचरी टिप्पणी करत न्यायालयाने सरकारची गंभीरता तपासली. त्यानंतर, आज मंत्रीपुत्र विकास गोगावले पोलिसांना शरण आला.

## राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ यांची ईडीकडूनही निर्दोष मुक्तता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

महाराष्ट्र सदन प्रकरणाला पूर्णविराम



महाराष्ट्राच्या राजकारणात आज मोठी आणि निर्णायक घडामोड समोर आली असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाकडून (ईडी) निर्दोष मुक्तता देण्यात आली आहे. दीर्घकाळ चर्चेत राहिलेल्या या प्रकरणात आता एसीबीपाठोपाठ ईडीकडूनही क्लिन चिट मिळाल्याने भुजबळ यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र सदन प्रकरणात छगन भुजबळ यांच्यासह इतर आरोपींनी ईडीकडे निर्दोष मुक्ततेसाठी अर्ज दाखल केला होता. प्रदीर्घ तपासानंतर ईडीने हा अर्ज मंजूर करत या प्रकरणात पुरावा नसल्याचं नमूद केलं आणि भुजबळ यांची अधिकृतपणे निर्दोष मुक्तता केली. या निर्णयामुळे भुजबळ यांचा दीर्घकाळ चाललेला कायदेशीर संघर्ष निर्णायक टप्प्यावर येऊन थांबला आहे.

दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या बांधकामात कथित आर्थिक अफरातफर झाल्याचा आरोप छगन भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात सुमारे ८५० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप करण्यात आला होता. भुजबळ यांच्यासह एकूण १४ जणांची नावे या कथित घोटाळ्यात पुढे आली होती. या आरोपांमुळे छगन भुजबळ यांना दोन वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला होता आणि त्यांचा राजकीय कारकिर्दीतील एक मोठा काळ अडचणींमध्ये गेला. मात्र तपासाअंती आधी एसीबी आणि आता ईडी-दोन्ही तपास संस्थांनी भुजबळ यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बीग्सी अभिनव, खर्चमुक्त उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

महिला प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत गृह विभाग तसेच परिवहन विभागाच्या सहकार्याने बीग्सी हा अभिनव आणि खर्चमुक्त उपक्रम सुरू करण्यात येत असल्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी सांगितले. एका सामाजिक जाणिवेतून सुरू झालेला हा प्रकल्प भविष्यात महिला सुरक्षेचा नवा अध्याय लिहील, असा विश्वासही परिवहन आयुक्त भिमनवार यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्र पोलीस, मोटार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस आणि इटीएस ३६० टेक्नोलॉजी सोल्युशन यांच्या सहकाऱ्याने मुंबई तसेच राज्यभरातील काळी पिवळी टॅक्सी आणि ऑटोरिक्षाकरिता बीग्सी (बीवायजीएसवाय) या सेवेचा आरंभ परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्या हस्ते झाला. यावेळी सह परिवहन आयुक्त शैलेश कामत, वाहतूकचे उपआयुक्त अजित




बोगार्डे, मुख्य प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील तसेच बीग्सीचे संस्थापक प्रोफ.निरंजन भट आदी उपस्थित होते.

परिवहन आयुक्त भिमनवार म्हणाले की, शहरीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा कामासाठीचा प्रवास वाढला असून त्यांच्या सुरक्षिततेबाबत कुटुंबीयांमध्ये कायम चिंता असते. दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर महिला सुरक्षेचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर गंभीरपणे घेतला गेला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रवासी वाहनात व्हेईकल लोकेशन अँड ट्रॅकिंग डिव्हाइस (व्हीएलटीडी) व पॅनिक बटन बसवणे बंधनकारक करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर इटीएस ३६० टेक्नोलॉजी सोल्यूशनचे संस्थापक प्रा.भट्ट आणि त्यांच्या टीमने सामाजिक जबाबदारीतून कोणताही आर्थिक भार न टाकता महिलांना सुरक्षा देणारा पर्यायी उपाय विकसित केला. कोरोना काळातील अडचणी, प्रशासकीय नियमांचा अभाव आणि तांत्रिक आव्हाने असूनही त्यांनी हार न मानता हा प्रकल्प पुढे नेला. परिवहन विभाग, पोलीस यंत्रणा आणि कमांड कंट्रोल सेंटरशी एकात्मता साधत हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात आला असल्याचे आयुक्त भिमनवार यांनी सांगितले.

हा उपक्रम सध्या ऐच्छिक असला तरी त्याची व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन परिवहन आयुक्त भिमनवार यांनी केले. ऑटो रिक्षांच्या मागील बाजूस माहिती फलक लावणे, ॲपचा वापर वाढवणे आणि प्रवासी व चालकांमध्ये विश्वास निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. योग्य प्रतिसाद यंत्रणा आणि कमांड कंट्रोल सेंटरच्या सतत सज्जतेवरच या प्रकल्पाचे यश अवलंबून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महिला सुरक्षेसाठी हा उपक्रम देशासाठी आदर्श ठरेल.

**योजनेविषयी माहिती :**

* मुंबई व महाराष्ट्रातील इतर प्रमुख शहरांतील ऑटो रिक्षा व टॅक्सींसाठी ईटीएस३६० सार्वजनिक / महिला सुरक्षा योजना सुरू करण्यात आली आहे.

* ही योजना महाराष्ट्र मोटार वाहन विभाग तसेच मुंबई / महाराष्ट्र पोलीस विभाग यांच्या सहकार्याने, एळर360 सोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांतर्गत राबविण्यात येत आहे.

* प्रवासी आसनासमोर तसेच चालकाच्या मागील बाजूस क्यूआर कोडसह चालक/ वाहन ओळख पॅनल बसविण्यात आले आहे.

** दिग्सी ॲपच्या माध्यमातून क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर गुगल मॅपवर वाहनाचा मार्ग दिसतो.

## शिंदेंचा पाठिंबा घेण्याएवढे वाईट दिवस आले नाहीत



■ मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंसोबत कोणत्याही प्रकारच्या युतीची शक्यता जोरकसपणे फेटाळून लावली आहे. आम्ही शिंदेंचा पाठिंबा घेणार नाही. एवढे वाईट दिवस शिवसेनेवर आले नाहीत. सत्ता मिळाली नाही म्हणून आमचा जीव तडफडत नाही, कळवळत नाही. त्यांनी पैशांचा वापर करून निवडणुका लढल्या व जिंकल्या. हा काही बाळासाहेबांचा विचार नव्हता. बाळासाहेब म्हणायचे की, यांच्यापेक्षा वेश्या परवडल्या, असे ते म्हणाले. भास्कर जाधव यांनी शुक्रवारी मुंबईत शिवसेनेचा महापौर बसवण्यासाठी एकनाथ शिंदेंना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी वरील भूमिका व्यक्त केली आहे. ते आज दुपारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. देशभरातून सर्वच मान्यवरांनी आजच्या दिवसानिमित्त आपले शुभसंदेश पाठवले आहेत. आम्हाला त्यांच्यापासून कशी ऊर्जा मिळाली, त्यांनी देशाला व महाराष्ट्राला कशी दिशा दाखवली अशा प्रकारची भूमिका शिवसेनाप्रमुखांना आदरांजली वाहताना मांडली.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत



■ मुंबई : भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या 26 जानेवारी रोजी राज्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये एकाचवेळी देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. राष्ट्र प्रथम या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या कवायती शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर होणार असून यामध्ये राज्यातील एक लाखांहून अधिक शाळांमधून, सात लाखापेक्षा जास्त शिक्षकांच्या उपस्थितीत सुमारे दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, आरोग्य जागृती, शारीरिकदृष्ट्या कसरत/ व्यायाम करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत मंत्री भुसे यांनी मंत्रालयात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यावेळी उपस्थित होते.

मंत्री भुसे म्हणाले, या कवायतींचा कालावधी साधारतः 15 ते 20 मिनिटांचा असेल. यासाठी सर्व शाळांना नमुना मार्गदर्शक व्हिडीओ पुरविण्यात आलेला असून सध्या प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांचा सामूहिक स्वरुपात कवायत संचलन सराव करून घेण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनी सामूहिक कवायत संचलन असल्यामुळे गावातील, शहरातील मैदानाच्या क्षमतेनुसार विद्यार्थी शाळेत अथवा एका मैदानावर एकत्र करून कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

## एकनाथ शिंदेंच्या नगरसेवकाला भाजपकडून बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

राज्यात आणि केंद्रात एकत्र सत्तेत असलेले भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) बदलापूर शहरात मात्र एकमेकांच्या अंगावर धावून जात असल्याचं धक्कादायक चित्र समोर आलं आहे. बदलापूर पश्चिमेतील सोनिवली परिसरात माघी गणपतीच्या दर्शनावेळी शिवसेना शिंदे गटाचे स्वीकृत नगरसेवक हेमंत चतुरे यांना भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे, ही संपूर्ण घटना सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण प्रचंड तापलं आहे.

ही घटना सोनिवली येथील आत्मिया हाइट्स या गृहनिर्माण संकुलात घडली. माघी गणपतीच्या दर्शनासाठी हेमंत चतुरे तेथे गेले असताना भाजप पदाधिकारी तेजस मस्कर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना अडवले. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही क्षणातच हा वाद थेट हाणामारीत बदलला. उपस्थित नागरिक पाहत असतानाच चतुरे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे सोसायटी परिसरात एकच खळबळ उडाली. या मारहाणीचा थरार सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे कैद झाला आहे. व्हिडीओमध्ये भाजप पदाधिकारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून चतुरे यांना घेरून मारहाण होत असल्याचं दिसतं. हे फुटेज सोशल मीडियावर व्हायरल होताच बदलापूरमधील राजकीय वतुर्ळात संताप व्यक्त केला जात आहे. सत्ताधारी पक्षांचे कार्यकर्ते अशा प्रकारे खुलेआम हिंसाचार करत असतील, तर सामान्य नागरिकांची सुरक्षितता काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या घटनेमागे राजकीय जळफळाट असल्याचा गंभीर आरोप शिवसेना शिंदे गटाने केला आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत हेमंत चतुरे यांचा भाजपच्या उमेदवाराकडून पराभव झाला होता. मात्र, त्यानंतर शिवसेना शिंदे गटाने त्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून सभागृहात संधी दिली. ही बाब भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना खटकली होती. याच नाराजीतून आणि जळफळाटातून हा हल्ला झाल्याचा आरोप शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी संजय जाधव यांनी केला आहे.

## वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे २७ जानेवारीला अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २३ :

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशन व वार्षिक आमसभा मंगळवारी ता. २७ महावीर भवन येथे होणार असून यावेळी राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर (वर्धा) यांनी दिली आहे.

हिंगोलीत आयोजित अधिवेशनाचे उदघाटन मंगळवारी ता. २७ सकाळी दहा वाजता पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकुळे उपस्थित राहणा आहेत. यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार हेमंत पाटील याच्यासह बालाजी पवार, विकास सूर्यवंशी, राजेंद्र टिकार, ज्येष्ठ सल्लागार शिवगोंडआण्णा खोत यांच्याबरोबरच आमदार संतोष बांगर, आमदार राजू नवघरे, माजी आमदार गजानन घुगे, माजी खासदार शिवाजीराव माने यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यात येणार असून स्वतंत्र विक्रेता मंडळाची अंमलबजावणी, पेन्शन योजना, आरोग्य व शिक्षण सुविधा, विक्रेत्यांची अधिकृत नोंदणी, पेपर स्टॉलसाठी जागा उपलब्धता, शासकीय योजनांचा लाभ, वैद्यकीय सुविधा, विक्रेता भवन उभारणी तसेच रेल्वे व एस.टी. प्रवास सवलती आदी मुद्द्यांवर ठराव मांडण्यात येणार आहेत. या राज्यस्तरीय अधिवेशनामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जाणार असून त्यांच्या हक्कांसाठी संघटनात्मक ताकद वाढीस लागणार असल्याचे पाटणकर यांनी सांगितले.

दरम्यान, मंगळवारी ता. २७ सकाळी साडेआठ वाजता प्रभात फेरी होणार आहे. त्यानंतर पहील्या सत्रात अधिवेशन उद्घाटन सोहळा, मान्यवरांचे मार्गदर्शन, विविध चर्चासत्रे होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये राज्य संघटनेची आमसभा दुपारी दोन वाजता होणार आहे. चार वाजता समारोप होमार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पिफमध्ये 'बाप्या' ठरला सर्वोत्तम मराठी चित्रपट

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २३ :

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) गुरुवारी सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार द एलिशियन फील्ड या चित्रपटाला, तर सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार बाप्या या चित्रपटाला महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर आणि आंतरराष्ट्रीय ज्युरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २४ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (पिफ) २०२६ यंदा १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आला. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, पिफचे यावर्षीचे आंतरराष्ट्रीय ज्युरी बी. जयमोहन (भारत), पिटर केरेकेस (स्लोव्हाकिया), रिट्टा आल्टो(फिनलँड), सिनू रामासामी (भारत), सेर्गी कासामीतजाना(स्पेन), टाटा मोटर्सचे व्यवस्थापक आनंद आगाशे, पुणे फिल्म फाउंडेशनचे विश्वस्त, पिफचे उपसंचालक विशाल शिंदे, आदिती अक्कलकोटकर उपस्थित होते.

## श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग



**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला - बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे त्याग आणि बलिदान यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.

त्यांच्या बलिदानामुळे वसुधैव कुटुंबकम या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धमासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे. त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्त्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते. ■ ■

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म,
महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

दररोज वाचनीय – दै. महासागर
दै. महासागर हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर, समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत

सोमवार – कॅलिडोस्कोप
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

मंगळवार – जोश
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

बुधवार – निरामय
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

गुरुवार – अस्मिता
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

शुक्रवार – भक्ती मार्ग
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

शनिवार – बालांगण
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

रविवार – साहित्य मैफिल
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत श्रीकृष्ण चांडक यांचा 'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.

ई-पेपर – महासागर मीडिया ग्रुप
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

डिजिटल महासागर मीडिया ग्रुप
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

महासागर युट्यूब न्यूज चॅनल
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता. महासागर मीडिया ग्रुप बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.

## शास्त्रीनगरातील सिद्धेश्वर गणपती मंदिरात गणेश जयंती उत्साहात साजरी

अकोला : शास्त्रीनगर, अकोला येथील सिद्धेश्वर गणपती मंदिरात गणेश जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गणेश जयंतीनिमित्त मंदिरात आकर्षक व मनमोहक सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने नटला होता. सकाळपासूनच गणरायाच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी दिसून आली. भाविकांनी रांगा लावून शांततेत व श्रद्धेने पूजा-अर्चा केली. संध्याकाळीही भक्तांची गर्दी वाढली असून, मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

### जिल्हा वार्षिक योजनेच्या २०२६-२७ प्रारूप आराखड्याला मान्यता

# एप्रिल-मे पर्यंत कामांचे प्रस्ताव सादर करा : पालकमंत्री



■अकोला,दि.२३(प्रतिनिधी)■

जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ च्या ३५२ कोटी ८६ लक्ष रू. निधीला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. जिल्ह्यात अधिकाधिक विकासकामांचा समावेश करून प्रस्ताव सादर करणे व मान्यता आदी कार्यवाही एप्रिल-मेपर्यंत पूर्ण करावी जेणेकरून निधी अखर्चित राहणार नाही, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.

जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, नितीन देशमुख, हरिश पिंपळे, साजिदखान पठाण, किरण सरनाईक, अमोल मिटकरी, वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, मनपा आयुक्त सुनील लहाने आदी यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्व लोकप्रतिनिधी विविध विषय मांडत असतात. त्यावर निर्णय होतात, निर्देश दिले जातात. अशा निर्देशांचे पालन दोन-तीन आठवड्यात पूर्ण झाले पाहिजे. वेळेत अनुपालन न होणे गंभीर आहे.प्रत्येक आराखडा करताना लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेणे व पालन होणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींची तक्रार आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

२०२५-२६ मधील आराखड्यातील निधीचे यंत्रणांना वितरण करण्यात आले आहे. नियोजित विकासकामे वेळेत पूर्ण करावीत. अखर्चित राहणाऱ्या निधीबाबत अहवाल १५ फेब्रुवारीपूर्वी सादर करावा जेणेकरून निधीचे योग्य पुनर्विनियोजन करणे शक्य होईल. त्याबाबत स्वतंत्र बैठक घेऊ, असेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी.

असेही निर्देश त्यांनी दिले.श्री राजराजेश्वर मंदिर विकास आराखड्याला मान्यताजिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारणमध्ये २४८.९८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत ८८ कोटी व अ. जमाती उपयोजनेसाठी १५.८८ कोटी अशा एकूण ३५२.८६ कोटींच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीकडून मान्यता प्रदान करण्यात आली. अकोल्याचे ग्रामदैवत असलेल्या श्री राजराजेश्वर मंदिर विकास आराखड्याला बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. अनुपालनाबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. लोकप्रतिनिधींनी दिलेल्या सूचनांवर वेळीच कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

### विस्तारित आयुष्यमान भारत योजनेचा पालकमंत्र्यांकडून आढावा

# रूग्णालयांची नियमित तपासणी व्हावी : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

■अकोला,दि.२३(प्रतिनिधी)■



विस्तारित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत सर्वांसाठी पाच लाखांपर्यंत विनामूल्य उपचाराची सुविधा शासनाने दिली आहे. तथापि, अंगीकृत रूग्णालयांबाबत तक्रारी येत आहेत. त्यादृष्टीने अशा रूग्णालयांची नियमित तपासणी करण्यात यावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.विस्तारित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधिक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, योजनेच्या समन्वयक शीतल गावंडे आदी उपस्थित होते. पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, विविध आजारांवरील शस्त्रक्रिया आदी ५ लक्ष रू. पर्यंतचे उपचार मिळत असल्याने गोरगरीब रूग्णांसाठी ही योजना दिलासा ठरली आहे.

तथापि, योजनेत अंगीकृत रूग्णालयांबाबत तक्रारी येत आहेत. त्यामुळे अशा रूग्णालयांची नियमित तपासणी करण्यासाठी टास्क फोर्स निर्माण करावा. प्रत्येक गरजू रूग्णाला योग्य उपचार मिळाले पाहिजेत, असे निर्देश त्यांनी दिले. गोल्डन कार्ड वितरण व इतर अनुषंगिक विषयांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात योजनेत ४४ अंगीकृत रूग्णालये असून, आतापर्यंत ६८ हजारहून अधिक रूग्णांनी योजनेत लाभ घेतला आहे, अशी माहिती श्रीमती गावंडे यांनी दिली.

## रानडुक्करामुळे दुचाकी अपघात, युवक जखमी

कुटासा: वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहे. अकोटहून दहीहांडा येथे दुचाकीवरून जात असलेल्या दोन युवकांचा अपघात रानडुक्कर अचानक रस्त्यावर आल्याने अपघात झाला. ही घटना कावसा गावाजवळ घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपातून अचानक रानडुक्कर रस्त्यावर धावून आले.

## १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाचे उदघाटन रविवारी

- राष्ट्रसंतांच्या विचारांचा होणार होणार जागर
- तप: पूर्ती वर्षा निमित्त विविध उपक्रम व स्पर्धांची रहाणार रेलचेल




■अकोला,दि.२३(प्रतिनिधी)■

( स्व. डॉ सुभाषजी सावरकर साहित्य नगरी) येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने दि. २५ व २६ जानेवारी दरम्यान १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन पार पडणार आहे अकोल्यातील रिंग रोड स्थित जानोरकर मंगल कार्यालय येथे हे संमेलन पार पडणार आहे. या विचार साहित्य संमेलनाचे तपपूर्ती वर्ष असल्यामुळे विविध स्पर्धा आणि कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. अशी माहिती विचार साहित्य संमेलन समितचे मुख्य संयोजक डॉ. रामेश्वर बरगट व स्वागतध्यक्ष प्रा. प्रकाश डवले, समितीचे अध्यक्ष गोपाल गाडगे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रसांच्या विचारांचा प्रचार व प्रसार त्यांच्या साहित्यद्वारे मोठया प्रमाणात व्हावा या प्रामाणिक प्रयत्नातून गेल्या बारा वर्षांपासून या विचार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. विविध क्षेत्रातील, तसेच राष्ट्रसंत साहित्यिक, व्याख्याते, लेखक, पत्रकार, कवी, मुलाखतकार यांची मोठया प्रमाणात संत विचारांचा जागर करण्यासाठी हजेरी असते. या वर्षी तप पूर्ती वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे १२ व्या संमेलनाच्या प्रथमच महिला संमेलनाध्यक्षा :प्रा. विजया मारोतकर (महाराष्ट्रतील सुप्रसिद्ध साहित्यिक व लेखिका नागपूर ) ह्या असणार, संमेलनाचे उदघाट्क आचार्य श्री हरिभाऊ वेरूळकर गुरुजी( अ. भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक गुरुकुंज ) स्वागतध्यक्ष प्रा. प्रकाशजी डवले सर, ( अध्यक्ष डवले एज्यूकेशन सोसायटी ) हे असतील.

## थोडक्यात

### जीव वाचवण्यासाठी तरुणाचा थेट न्यायालयाच्या रेकॉर्ड रूममध्ये प्रवेश

**अकोला :** शहरातील न्यायालय परिसरात सुरू असलेल्या एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान वादी आणि प्रतिवादी पक्षामध्ये अचानक तणाव निर्माण झाला. सुनावणीनंतर दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन वातावरण चिघळले. या वादाचे रूपांतर हिंसक झटापटीत होण्याच्या मार्गावर असतानाच तीन ते चार तरुणांनी एका तरुणावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. हल्लेखोरांच्या तावडीतून सुटण्यासाठी संबंधित तरुणाने आपला जीव वाचवण्यासाठी थेट न्यायालयाच्या रेकॉर्ड रूममध्ये धाव घेतली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली. काही काळासाठी न्यायालयातील काम काजावरही परिणाम झाल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत संशयित तरुणांना ताब्यात घेतले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. कोणत्याही प्रकारचा गंभीर अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी न्यायालय परिसरात अतिरिक्त सतर्कता बाळगली.

### शिवगोरक्ष मंदिर येथे धर्मनाथ बीज उत्सव

अकोला : श्री शिवगोरक्ष मंदीर येथे धर्मनाथ बीज उत्सव संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन सुधाकर पाठक यांनी केले. बाल कलाकारांनी शिवपार्वती विवाह ही धार्मिक नाटिका सादर केली. यामध्ये भक्ती साळुंके, आनंदी साळुंके, गोपी साळुंके, जानवी पाटील, समीक्षा पारसकर, विश्वा इंगळे, रितेश गौरव वाडेकर, सार्थक शिव मालगे वीर इंगळे, प्रणव वाघमारे, केदार इत्यादी बालकलाकार होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धर्मनाथ इंगळे तर प्रमुख पाहुणे मनोहर इंगळे, सुधीर काहकर, करण शाहू उपस्थित होते.यज्ञ महापुजा आकाश देशमुख यांच्या हस्ते झाली. तसेच बॉक्सर सुवर्णपदक विजेती कांचन सुरोशे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी गजानन इंगळे यांनी शंखनाद करुन वातावरणभक्तीमय केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश साळुंके, यश साळुंके, अक्षय देशमुख, दादु मोरे,प्रणव वाघमारे, श्याम वाडेकर, पवन तिहीले यांनी सहकार्य केले.

# मनपात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

## मनपात सामुहिकरित्या घेण्यात आली लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ

■अकोला,दि.२३(प्रतिनिधी)■

दि. २३ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने तसेच मुख्य लेखा अधिकारी बैजनाथ शेळके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य आज दि. २३ जानेवारी रोजी मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्याद्वारे लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची सामुहिकरित्या शपथ घेण्यात आली.यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मनपा मुख्य लेखा अधिकारी बैजनाथ शेळके, उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, सहा. आयुक्त विठ्ठल देवकते, महानगरपालिका सचिव अमोल डोईफोडे, निवडणूक



विभाग प्रमुख अनिल बिडवे, विधी अधिकारी शाम ठाकुर, शाम बगेरे यांचेसह इतर अधिकारी आणि कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# 'लाडका भाऊ' कुठे गेला?११ महिने राबलो: आज बेरोजगार!

■मुर्तिजापुर,दि.२३(प्रतिनिधी)■

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून जिल्ह्यातील शेकडो तरुण-तरुणींना ६ ते १० हजार रुपयांच्या तुटपुंज्या मानधनावर तब्बल ११ महिने राबवून घेतल्यानंतर अचानक रस्त्यावर फेकण्यात आले आहे. शासनाकडे निधी नाही, असे कारण पुढे करत प्रशिक्षणार्थींना सेवेतून कमी करण्यात आले; मात्र अनेक विभागांत आजही पदे रिक्त आहेत.

कायम करा असा हट्ट नाही, पण रिक्त जागांवर कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने सामावून घ्या, अशी ठाम मागणी युवा प्रशिक्षणार्थी संघटनेने उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.योजनेच्या शासन निर्णयात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार देण्याची स्पष्ट तरतूद असतानाही एकाही प्रशिक्षणार्थ्याला नियुक्ती मिळालेली नाही, ही गंभीर बाब संघटनेने उघड केली. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आवाज उठवताना युवा-युवतींवर लाठीचार्ज झाला; त्यामुळे



- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचा आक्रोश
- रिक्त पदे असूनही नोकरी नाही; मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

कसल्या लाडक्या बहिणी आणि कसला लाडका भाऊ? असा संतप्त सवाल प्रशिक्षणार्थ्यांनी उपस्थित केला आहे. जिल्हास्तरीय बैठक घेऊन रिक्त पदांवर प्रशिक्षित उमेदवारांना संधी द्यावी, नवीन भरती थांबवून प्रशिक्षणार्थ्यांना प्राधान्य द्यावे, सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी प्रशिक्षित शिक्षक घ्यावेत व आस्थापनांसाठी निधी उपलब्ध करावा, अशा ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत. न्याय न मिळाल्यास अधिवेशनापूर्वीच बेमुदत आमरण उपोषण छेडले जाईल, असा थेट इशारा देत युवा प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशासनासमोर आरपारची लढाई जाहीर केली आहे.

# अपघात टाळण्यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांनी स्वत: लावले वाहनावर रिफ्लेक्टर



**अकोला :** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आरटीओ विभागातर्फे वाहनांना मोफत रिफ्लेक्टर मोहीम , रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत रिफ्लेक्टर नसलेल्या शंभरच्या वर वाहनावर लावण्यात आले रिफ्लेक्टर, अकोला, अकोला येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शेतकऱ्यांना रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत अकोला आरटीओ रवींद्र भुयार तसेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयाचे वरिष्ठ वाहन निरीक्षक किरण कुमार लोणे तसेच मोटर वाहन निरीक्षक क्षितिज व्यवहारे, अक्षय ईश्वरे, यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शेतकऱ्यांना रस्ता सुरक्षा निमित्त मार्गदर्शन केले यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंदू चौधरी सचिव सुनील मालोकार विभाग प्रमुख सुनील ठोकळ कर्मचारी सागर काळे तसेच व्यापारी परिमल लहाने, यावेळी उपस्थित होते, यावेळी शेतकऱ्यांच्या वाहनांना आरटीओ अधिकाऱ्यांनी स्वतः विविध वाहनाच्या दर्शनीय भागावर रिफ्लेक्टर लावण्यात आले आहे रात्री चे अपघात टाळता यावे.

# इतिहासाच्या पानावर नेताजी अमर झाले : राम शेगोकार गुरुजी

■अकोला,दि.२३(प्रतिनिधी)■

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या राष्ट्रभक्तीचा अखंड दीप भारतीयांच्या अंतकरणात अखंड तेवत आहे. इतिहासाच्या पानावर नेताजी आजही अमर झाले आहेत असे प्रतिपादन महाराष्ट्र अंनिस चे महानगर अध्यक्ष व सेवा समितीचे कार्यवाह राम शेगोकार गुरुजी यांनी केले. स्व. विनयकुमार पाराशर स्थापित अकोला जिल्हा सेवा समितीच्या वतीने आयोजित नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्सव कार्यक्रमात बोलत होते. सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, बाबूजी देशमुख वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्रा, अनिल मावळे, रूपाली तायडे, फय्याज मोहम्मद यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वतंत्रतासेनानी जी.के. वाघमारे दरवर्षी नेताजी सुभाषचंद्र चौक, मोहम्मद अली रोड येथे जयंती उत्सवाचे आयोजन करायचे. तोच वारसा पुढे चालवत त्यांच्या कन्या श्रीमती उषा आत्माराम तायडे यांनी या कार्यक्रमाचे प्रयोजन केले होते. कार्यकर्त्यांनी परिसर स्वच्छ करून देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास हारार्पण करून अभिवादन केले.

सद्या ऐतिहासिक महापुरुषांमध्ये एक दुसऱ्यांना लढवून भारतीय समाजात वैमनस्य निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नेताजी सुभाषचंद्र बोस व पंडित जवाहरलाल नेहरू एक दुसऱ्या चे दुश्मन कधीही नव्हते तर एकमेकांचे सहकारी व परस्पर पूरक होते.दोघांनीही




नेहमी एकमेकांचे अस्तित्वाचा आणि विचारांचा सन्मान केला आहे. दोघांचेही लक्ष भारताला पूर्ण राजनैतिक स्वातंत्र्य मिळवून देणे हेच एकमेव लक्ष होते म्हणून नेहरू जी व नेताजींचा खरा इतिहास तरुण पिढीसमोर मांडण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अनुराग मिश्रा यांनी केले.

नेताजींचे जीवन म्हणजे धैर्याचा धडा, त्यागाची शिदोरी आणि राष्ट्र प्रेमाची अखंड साधना होती. 'तुम मुझे खून दो.! मैं तुम्हे आजादी दूंगा!!' हे त्यांचे शब्द आजही तरुणांच्या मनात विजे सारखे चमकतात. हे शब्द केवळ घोषणा नव्हती तर त्यांच्या जीवनाचा समर्पक श्वास होते.म्हणून सर्व जाती, धर्म, पंथ भेद विसरून राष्ट्राची एकात्मता अखंडीत राखणे हिच नेताजींना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन बबनराव कानकिरड यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद दादासाहेब रत्नपारखी यांनी केले. आभारप्रदर्शन वेदश्री विशाल तायडे यांनी केले.' एक बनेंगे - नेक बनेंगे ,' ' भारत माता की जय!', 'कश्मीर हो या कन्याकुमारी-भारत माता एक हमारी.' या घोषणेने कार्यक्रमाची सांगता झाली.माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, युवानेता मनीष मिश्रा,सुरेश ढाकोलकर, राजाभाऊ चौधरी, समाजसेवक रहेमान बाबू, माजी नगरसेवक शेख बुरहान मंतूवाले, उर्दू शिक्षक संघटनेचे नेते सरदार खान, महादेवराव मेहेंगे, देवकाते साहेब, रामराव पाटेखेडे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.अकोला जिल्हा सेवा समिती,नशाबंदी मंडळ, सर्वोदय मंडळाचे कार्यकर्ते, देशभक्त नागरिक,विदयार्थी या प्रसंगी उपस्थित होते.

## पातुर शहरात वटेश्वर महादेव संस्थान तथापिंपळेश्वर महादेव मंदिर संस्थान वर अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन



■पातुर,दि.२३ (प्रतिनिधी)■ शहरांमधील वटेश्वर महादेव मंदिर संस्थान माहूलीकर नगर तथा पिंपळेश्वर महादेव मंदिर संस्थान येथे अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून वटेश्वर महादेव मंदिर येथे भागवत श्रीमदब भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे करण्यात आले असून सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२६ ते २६ जानेवारी २०२६ सोमवार पर्यंत राहणार आहे पिंपळेश्वर महादेव मंदिर संस्थान येथे सुद्धा दिनांक २४ जानेवारी २०२६ ला दुपारी चार वाजता नगर प्रदक्षिणा त्यानंतर दिनांक २५ जानेवारी २०२६ ला सकाळीसहा ते सात वाजता होम हवन आणि दोन्ही महादेवाच्यामंदिराच्या कळसाची स्थापना करण्यात येणार आहे यामध्ये प्रमुख उपस्थिती भागवताचार्य ह भ प चक्रधर राऊत पास्टूल,भागवताचार्य ह भ प लक्ष्मण दाजी महाराज श्रीराम आश्रम वनदेव भागवताचार्य ह भ प नारायण दास जी महाराज श्री राम आश्रम वंनदेव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे .

# अकोला मनपात भाजप व मित्रपक्षांची सत्ता निश्चित
## महापालिकेत भाजपचाच महापौर होणार : आ. रणधीर सावरक



▪अकोला,दि.२३ (प्रतिनिधी)▪अकोला महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष आणि मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार असल्याचा ठाम दावा आमदार रणधीर सावरकर यांनी केला आहे. महापालिकेतील संख्याबळ, मित्रपक्षांचा पाठिंबा आणि आगामी राजकीय घडामोडी लक्षात घेता अकोल्यात भाजपप्रणीत सरकार निश्चित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आ. सावरकर म्हणाले की, भाजप व मित्रपक्षांकडे आवश्यक बहुमत उपलब्ध असून महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समितीसह सर्व महत्त्वाच्या पदांवर भाजपचाच झेंडा फडकणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्थिर आणि सक्षम नेतृत्व देण्यास भाजप कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपप्रणीत सत्तेतून शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रात वेगाने कामे होतील, असा विश्वास आ. सावरकर यांनी व्यक्त केला. अकोल्याच्या विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

# विद्यार्थ्यांनी अनुभवला उंच इमारतींवरील बचाव कार्याचा थरार!
## राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम आव्हान

▪अकोला,दि.२३ (प्रतिनिधी)▪
शिबिराच्या आज सहाव्या दिवशी सकाळच्या योगा व प्राणायाम या सत्रानंतर दीक्षांत सभागृहात आयोजित पहिल्या व्याख्यानाच्या सत्रामध्ये उंच तथा अति उंच इमारती मध्ये काही दुर्घटना घडल्यास नागरिकांचे जीव वाचविणेसाठी करावयाच्या उपाय योजना या विषयावर व्याख्यान एनडीआरएफ मार्फत देण्यात आले.

इन्स्पेक्टर श्री ईश्वरदास मते श्री मिश्रा श्री पासवान श्री अरुण कुमार श्री अजय यादव यांनी असिस्टंट कमांडर सारंग कुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले

चान्सलर्स ब्रिगेड आव्हान २०२६, आपत्ती व्यवस्थापन शिबिर दिवस आव्हानाचा होता यात आगीत अडकलेल्या व्यक्तींना बचावा विषयक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. बिल्डिंग हाइ राईस उंचावरील बचाव या प्रात्यक्षिकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दर, खाईत पडलेल्यांना वाचवणे, बस वाहन इत्यादी अपघाताने दरीत कोसळणे यामध्ये दोराच्या साह्याने व उपयुक्त व अवती भवती उपलब्ध संसाधनांचा वापर करून मदत करण्याच्या प्रक्रिया चे विश्लेषण करण्यात आले. सर्वप्रथम हाय राईज मध्ये वापरात येणाऱ्या साहित्याची ओळख करून देण्यात आली व विविध प्रात्यक्षिक ज्यामध्ये बॉडी हारनेस, डबल रोप असेंडिंग, लहान मुलाचे बचाव, बेशुद्ध व्यक्तीस इमारतीवरून खाली आणणे, घाबरलेल्या व्यक्तीस खाली आणणे, टायगर लिफ्ट सीट हार्नेसचा वापर, रॅपलिंग पिगी बॅग कॅरी, कॅटवॉक, फ्रंट रॅपलिंग, अशा अनेक प्रात्यक्षिकानी सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थितताना मोहित केले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी आयोजित 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे' चवथ्या दिवशी ' पूरसदृश्य परिस्थितीत जीवितहानी टाळण्यासाठी आपत्कालीन नियोजन' या कृतियुक्त प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी स्वतः प्रत्येक कृतीत सहभाग घेतला. एनडीआरएफ टीमने अगोदरच संपूर्ण प्रशिक्षणाची पूर्वतयारी करून ठेवली होती. विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहात संपूर्ण दिवसभर एनडीआरएफ जवानांनी कृतीयुक्त प्रशिक्षणाचे धडे गिरविले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे आणि विद्यार्थी कल्याण कार्यालयाच्या सर्व अधिकारी कर्मचारी वर्गाने आपल्या अथक परिश्रमातून शिबिराचा चौथा दिवसही अतिशय यशस्वी केल्याची भावना होती.





# अनिष्ट चालीरीतींना तिलांजली देत परिवर्तनाचा संदेश
# कमी खर्चाचे लग्न,कमी खर्चाची शेती काळाची हाक
## मराठा योद्धा गजानन हरणे यांचे समाजाला आवाहन

▪अकोला,दि.२३ (प्रतिनिधी)▪
समाजाच्या प्रगतीला अडसर ठरणाऱ्या अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धा व अवाजवी खर्चाच्या प्रथांना मूठमाती देत नव्या सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी मराठा पाटील समाज सज्ज झाला आहे. कमी खर्चाचे लग्न आणि कमी खर्चाची, शाश्वत शेती ही काळाची गरज असल्याचे ठाम प्रतिपादन करीत मराठा योद्धा गजानन हरणे यांनी समाजाला साद घातली आहे.मराठा पाटील संघाच्या वतीने आयोजित समाज संवाद पदयात्रा सध्या बाळापूर तालुक्यात गावागावांतून मार्गक्रमण करीत असून, या यात्रेला सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सकाळी आठ वाजता सुरू होणारी ही संवादयात्रा रात्री उशिरा दहा-अकरा वाजेपर्यंत अविरत चालू राहते. दररोज आठ ते दहा गावांमध्ये थांबून थेट जनतेशी संवाद साधत, त्यांच्या प्रश्न-समस्या जाणून घेत चर्चा व उपाययोजना मांडल्या जात आहेत.या पदयात्रेच्या माध्यमातून मराठा पाटील समाज जागृत, संघटित व परिवर्तनाभिमुख करण्याचे कार्य सुरू आहे. सामाजिक एकता, आर्थिक शिस्त आणि विवेकशील विचारांचा प्रसार हे या यात्रेचे प्रमुख उद्दिष्ट ठरले आहे. समाजातील खर्चिक लग्नपद्धती, अंधश्रद्धा, शेतीतील वाढते उत्पादनखर्च यावर प्रबोधन करत साधेपणा, आत्मनिर्भरता व विज्ञाननिष्ठा यांचा संदेश दिला जात आहे.

दिनांक १७ जानेवारीपासून सुरू झालेल्या या समाजसंवाद पदयात्रेचा २६ जानेवारी २०२६ रोजी समारोप स्व. प्रा. राजदत्त मानकर यांच्या वाडेगाव या गावात होणार आहे. संपूर्ण तालुक्यातून फिरणारी ही यात्रा सामाजिक एकतेचा दीप प्रज्वलित करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.या यात्रेत बाळापूर मराठा पाटील संघटनेचे पदाधिकारी, मार्गदर्शक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. संघटनेचे अध्यक्ष शरद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवकराम ताथोड, ज्येष्ठ नेते संदीप पाटील, ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे, अशोकराव अमानकर यांच्यासह संघटनेचे सचिव मधुसूदन माळी, कोषाध्यक्ष शशिकांत नकाशकर, गणेश मुरूमकर, प्रशांत गायकवाड, रुपेश पटोकर, विठ्ठल नळकांडे, धनंजय नेमाडे, महेश लांडे, प्रसिद्धीप्रमुख देवानंद साबळे तसेच मार्गदर्शक समन्वयक आनंदराव ठाकरे, श्रीराम लांडे, संजय कराळे, हिम्मतराव मेटांगे, पांडुरंग तायडे, बाळकृष्ण तायडे, जनार्दन तायडे, राजेश माळी आदींसह शेकडो कार्यकर्ते यात्रेत सक्रिय आहेत.काजीखेड ते वाडेगाव असा प्रवास करणाऱ्या या समाज संवाद पदयात्रेत ठरावीक तारखांना विविध गावांत मुक्काम व संध्याकाळी जाहीर सभा होत असून, त्या माध्यमातून समाजप्रबोधनाची मशाल पेटवली जात आहे. जानोरी-मोखा,दगडखेड-नागद-सागद, सोनाळा-बोरगाव वैराळे, हसनापूर-मोरगाव सादिजन, अडोशी-कडोशी, सोनगिरी-कसुरा-पारस आदी गावांमध्ये संवाद साधत परिवर्तनाचा संदेश पोहोचवला जात आहे.समाजहितासाठी विचारांची लढाई उभारणारी ही पदयात्रा म्हणजे केवळ चालता-बोलता कार्यक्रम नसून, विवेक, एकता आणि स्वाभिमानाचे सामाजिक आंदोलन ठरत आहे, असे मत उपस्थित गावकरी नागरिकांतून व्यक्त होत आहे. गावागावातील प्रचंड समाजाचा प्रतिसाद म्हणजेच यात्रा सफल झाल्याचे संकेत आहे.




# माँ शारदा ज्ञानपीठमध्ये आनंद मेळावा तसेच चित्रकला प्रदर्शनीचे आयोजन

▪अकोला,दि.२३ (प्रतिनिधी)▪
श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ द्वारा संचालित मा सारदा ज्ञानपीठ गीता नगर अकोला येथे आज विद्यार्थ्यांसाठी आनंद मेळाव्याचे तसेच चित्रकला प्रदर्शनीचे आयोजन अतिशय नियोजनबद्ध उत्साह पूर्ण वातावरणात करण्यात आले .

या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती व प्रमुख अतिथी म्हणून अकोल्याची ख्यातनाम शल्यचिकित्सक डॉ.अजय सिंग चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रशांत खत्री, व्यवस्थापक राहुल देशमुख, उपमुख्याध्यापिका श्रीमती सावित्री विश्वकर्मा हे देखील उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. अजयसिंग चव्हाण तसेच डॉ. सत्यनारायण बाहेती यांच्या हस्ते मा सारदा च्या फोटोचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. व फित कापून चित्रकला प्रदर्शन व आनंद मेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला.विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पदार्थांचे स्टॉल्स लावले . यामध्ये कचोरी, समोसा, दाबेली ,भजे , खिचडी, चिंचा, बोर आलू वडा ब्रेड पकोडा पाणीपुरी मिसळ पावभाजी गुलाब जामुन त्याचप्रमाणे अन्य पदार्थ ठेवण्यात आले होते. सोबतच विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये फुलवलेली परसबाग हा सुद्धा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. व विद्यार्थ्यांनी आज खरी कमाई करून व्यावहारिक शिक्षणाचे धडे घेतले. तसेच कलाशिक्षक सचिन पाईकराव यांनी विद्यार्थ्यांकडून आणि शिक्षकांकडून अतिशय उत्कृष्ट चित्र काढून घेत प्रदर्शनीचे आयोजन केले होते. प्रमुख अतिथिनी आणि मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे विशेष कौतुक केले त्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या अतिशय सुंदर आयोजन या आनंद मेळाव्याचे करण्यात आले होते . स्वच्छता, नीटनेटकेपणा, स्टॉल डेकोरेशन, मेनू कार्ड , डस्टबिन याकडे विशेष लक्ष देण्यात आले होते.या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित राहून त्यांनी मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाला शिक्षिका पद्मिनी शिंदे, पुनम गावंडे, मंजुषा शर्मा, योगिता सरनाईक, दिपाली चव्हाण, नीलिमा चव्हाण, सुषमा दाभाडे, प्रतिभा दुधे, शिवानी बैस, निकिता दुधे, सीमा परतवार, प्रीती शिंदे, स्वाती गावंडे, कार्तिक झोंबाडे तसेच सचिन पाईकराव यांचे विशेष सहकार्य लाभले .



### अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा देवीच्या चरणी
# पवन विखेंनी अर्पण केला मातेला टोप



▪तेल्हारा,दि.२३ (प्रतिनिधी)▪
अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मुऱ्हा येथील जागृत देवस्थान असलेल्या श्री मुऱ्हा देवीच्या मंदिरात काल दोन अज्ञात नराधमांनी चोरी करून देवीचा टोप आणि इतर साहित्य पळवल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात आणि भाविकांमध्ये संतापाचे वातावरण असतानाच, तेल्हारा येथील श्री. पवन विखे यांनी भक्ती आणि उदारतेचे दर्शन घडवत आज तात्काळ मंदिरात येऊन मातेच्या चरणी नवीन टोप अर्पण केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्रीच्या सुमारास अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा देवीच्या मंदिरात चोरी झाली होती. दोन चोरांनी देवीच्या मूर्तीवरील चांदीचा टोप आणि इतर मौल्यवान साहित्य लंपास केले होते. मुऱ्हा देवी हे अंजनगाव तालुक्यातील एक अत्यंत जागृत देवस्थान असल्याने ही वार्ता परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि भाविक दुखावले गेले. मात्र, ही बातमी तेल्हारा येथील सामाजिक कार्यकर्ते आणि देवीभक्त श्री. पवन विखे यांच्या कानावर पडताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न करता यावर तोडगा काढण्याचे ठरवले.

# केशवनगर परिसरात श्रीमद देवी भागवत तथा पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सवाचे आयोजन



### भागवताचार्य अंबरीश महाराज जोशी,सोनईकर यांच्या ओजस्वी वाणीतून साकारणार सप्ताह

▪अकोला,दि.२३ (प्रतिनिधी)▪
श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने स्थानीय केशवनगर परिसरात श्रीमदब देवी भागवत सप्ताह व पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.कथा निरूपणकार म्हणून भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी सोनईकर हे लाभणार आहेत. या उत्सवात पंचकुंडात्मक शतचंडी याग ही होणार असून पंचक्रोशीतील महिला पुरुष भक्तांसाठी ही मोठी पर्वणी श्री जगदंब परिवाराच्या माध्यमातून उपलब्ध झाली असल्याची माहिती जगदंब परिवार अकोलाच्या वतीने शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. मंगळवार दिनांक २७ जानेवारी ते सोमवार दिनांक २ फेब्रुवारी पर्यंत केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात ही कथा होणार आहे. श्री हरिहर सद्गुरू शक्तीपीठ संभाजीनगरच्या पू. गिरजामाता आईसाहेब यांच्या आशीर्वादाने व प पु सद्गुरु पिठाधिश्वर श्री अप्पा महाराज यांच्या पावन स्मृतीत हे आयोजन होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सोमवार दिनांक २६ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत नित्य सायं ५-३० ते रात्री ८ वाजेपर्यंत ही कथा होणार आहे. २६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्रीमद देवी भागवत ग्रंथाची शोभायात्रा परिसरात आयोजित करण्यात आली आहे.कथास्थळी दररोज सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत भजन,पूजन व हवन होऊन सायं ५ वाजता श्रीसूक्त, योगपिठासन स्त्रोत व कुंजिकास्त्रोत पठण होणार आहे. नित्य स ६ वाजता काकडा, स ७ वाजता सद्गुरु पादुका पूजन,स. ८ ते स. ११ वाजेपर्यंत दुर्गा सप्तशती पाठ होणार आहे. गुरुवार दिनांक २९ जानेवारी रोजी पूज्य श्री अनिरुद्ध महाराज,संभाजीनगर यांची पावन उपस्थिती उत्सवात लाभणार आहे. सोमवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी स १० वाजता देवी भागवत कथा व शतचंडी यागाची पूर्णाहुती व दु १२ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाने या उत्सवाची सांगता होणार होणार आहे.

# संत दर्शनाने भगवंत प्राप्ती-हभप अरुण महाराज लांडे

▪अकोला,दि.२३(प्रतिनिधी)▪
संत दर्शन प्राप्ती असाध्य बाब आहे. कारण संत हा शिष्याच्या जीवनातील परिस असून संत दर्शनाने भगवंत प्राप्तीचा मार्ग दिसतो. साक्षात भगवंताचे दर्शन संतांच्या माध्यमातून होऊ शकते. म्हणून भगवंत प्राप्ती व शाश्वत सुखाची अभिलाषा बाळगणाऱ्या भक्तांनी संतांचा अनुग्रह सेवेच्या माध्यमातून प्राप्त करण्याचा हितोपदेश हभप अरुण महाराज लांडे यांनी दिला.

स्थानीय फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या संगीतमय रामायण व कीर्तन उत्सवात कीर्तनाचे चतुर्थ पुष्प पारस येथील कीर्तनकार हभप अरुण महाराज लांडे यांनी गुंफले.संत तुकोबारायांच्या'उजळलें भाग्य आतां,अवघी चिंता वारली,संतदर्शनें हा लाभ, पाद्मनाभ जोडला,संपुष्ट हे ह्रुदयपेटीं, करुनि पोटीं सांठवूं,तुका म्हणे होता ठेवा, तो या भावा सांपडला,'याअभंगवार त्यांनी आपले मार्मिक व श्रोत्यांना हसवित संगीतमय कीर्तन सादर केले.ते म्हणाले, जगाचे कल्याण कशात आहे याची चिंता संतांना आहे.जगाची अधोगती संतांना बघवत नाही.म्हणून सदा जगाच्या कल्याणात ते असतात.संत हे मनुष्य देहाच्या कर्तव्याची सातत्याने जाणीव करून देत असतात.

८४ लक्ष योनी मधून हा पावन देह मिळाला असून याचा उपयोग भक्तीने भगवंत प्राप्ती करून योनीमुक्त होण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. आपल्या व्यंगात्मक व सतत हसवणाऱ्या वाणीतून त्यांनी या तुकोबारायांच्या अभंगाचा विनोदाच्या माध्यमातून परामर्श घेतला. ते पुढे म्हणाले ज्या दिवशी संतांची भेट झाली तेव्हाच खरे भाग्य उजळते. मात्र ही भेट तितकी सोपी नाही. यासाठी फार कष्ट करावे लागतात. संतांची भेट होणे म्हणजे पापातून मुक्ती होण्यासारखे आहे. यावेळी त्यांनी गुरुभक्तीने शिष्य हे पुढे परिस होतात या संदर्भात अनेक उदाहरणे अभंगाच्या माध्यमातून सादर केलीत. संत गजानन महाराज यांचे परम शिष्य भास्कर पाटील हे संत सेवेमुळेच पुढे भास्कर महाराज बनले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.सर्वप्रथम हभप अरुण महाराज यांचे समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. तर दैनिक अन्नदाते अतुल येळणे व हर्ष चौधरी यांचे ही स्वागत करण्यात आले.



# बचत गटीतील महीलांसाठी शिवण काम प्रशिक्षण मोफत

▪अडगाव बु.दि.२३ (प्रतिनिधी)▪
तेल्हारा तालुक्यातील अडगाव शिवाजीनगर येथिल लालमारोती संस्थान येथे बचत गटातील महीलांकरिता शिवण काम प्रशिक्षण सुरु करण्यात आले या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र सरकार मगासवर्गीय बहुजन वृद्ध विभाग,मुंबई महात्मा ज्योतीबा फुले संशोधन आणी प्रशिक्षण संस्था यांच्या विद्यमानाने स्वयंम रोजगार,पोशाख,अप आणि गृह फर्निशिंग कौशल्य प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.यावेळी सर्व प्रथम क्रार्यक्रमाचे उदघाटक शिवाजी ग्रामसंघाच्या सचिव मंजुशाताई दिनेश गिंहे यांच्या हस्ते रिबीन कापुण शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर साविञीबाई फुले यांच्या प्रतीमेला हार फुल वाहुण पुजण करण्यात आले.



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO(Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | ODP-II / Rfx No. 3000065247 / Erection of Grit Filter Pump House & MS Pipeline from Grit Filter to AHP Pump house to enhance water management system at CSTPS, Chandrapur / Rs.14204434.41/- |
| 2 | ODP-II / Rfx No. 3000065253 / Supply of Complete pump assembly for clear water pump house & suction bell for Raw water pump installed at Effluent Treatment plant-I, ODP-II, CSTPS, Chandrapur / Rs.1157676/- |
| 3 | ICIII / Rfx No. 3000065240 / Procurement of Direct Mount and Remote mount Electro-pneumatic Smart positioners for Valves and dampers for C&I-III, Unit 8 & 9, CSTPS, Chandrapur / Rs.3268000/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr.No.01 to 03)** For any query Contact No.8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# दावोस २०२६ : राजनितीक बंड आणि बदलती जागतिक व्यवस्था

दावोस २०२६ - केवळ एक आर्थिक मंच नाही, तर जागतिक सत्ता संघर्षांचे एक क्षेत्र आहे. भारत-युरोप-अमेरिका त्रिकोण अशा धोरणात्मक संतुलनाची एक नवीन चाचणी आहे. ट्रम्प युगातील आक्रमक अमेरिका फर्स्ट धोरणामुळे भारत-युरोप-अमेरिका त्रिकोणातील दीर्घकालीन लोकशाही मूल्ये, मुक्त व्यापार आणि सामायिक सुरक्षा हितसंबंध अस्थिर होण्याची शक्यता आहे.

--------------

१९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या ५६ व्या वार्षिक बैठकीची इतिहासात केवळ आर्थिक वादविवादांसाठीच नव्हे तर अमेरिका आणि त्यांच्या पारंपारिक मित्र राष्ट्रांमधील उघड राजनितीक संघर्षासाठीही आठवणीत ठेवली जाईल. हे तेच व्यासपीठ आहे जिथे ऐतिहासिकदृष्ट्या जागतिक सहमती निर्माण झाली आहे, परंतु यावेळी जागतिक मतभेद केंद्रस्थानी होते.

ट्रम्प यांचा दुसरे कार्यकाळ आता स्पष्टपणे दर्शवित आहे की अमेरिका फर्स्ट ही एकट्या अमेरिकेकडे वाटचाल करत आहे आणि युरोप, कॅनडा आणि ब्रिटनसारख्या देशांसाठी हे असह्य होत आहे. २२ जानेवारी रोजी, ट्रम्प दावोसला रवाना होत असताना, त्यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला. त्यांना सीमावर्ती भागात आपत्कालीन लँडिंग करावे लागले आणि नंतर दुसऱ्या विमानाने दावोसला जावे लागले.

ही घटना केवळ तांत्रिक व्यत्यय नव्हता, तर अनेक विश्लेषकांनी ती अमेरिकन नेतृत्वाच्या अस्थिरतेचे प्रतीकात्मक संकेत मानली. योजनेनुसार, ट्रम्प यांना ४५ मिनिटांचे भाषण द्यायचे होते, परंतु ते ७० मिनिटे स्टेजवर राहिले आणि त्यांनी युरोप, नाटो, कॅनडा आणि जागतिक व्यवस्थेवर तीव्र हल्ला चढवला. हे भाषण बचावात्मक नव्हते, तर आक्रमक आणि इशाऱ्यांनी भरलेले होते. ट्रम्प यांचे दावोस भाषण स्पष्टपणे दर्शवते की त्यांनी भागीदारीची भाषा सोडून दिली आहे आणि उघडपणे सत्तेचे राजकारण स्वीकारले आहे. त्यांचे काही मुख्य मुद्दे होतेः

(१) ग्रीनलँडच्या सुरक्षिततेची हमी फक्त अमेरिकाच देऊ शकते, सार्वभौमत्वाला थेट आव्हान; (२) कॅनडा अमेरिकेमुळे अस्तित्वात आहे, मित्र राष्ट्राचा अपमान; (३) ट्रम्प यांचा नाटोवरील अविश्वासः सुरक्षा आघाडीचा पाया हादरवणे; (४) ते ग्रीनलँडसाठी बळाचा वापर करणार नाहीत, परंतु अटींसह. या मुद्द्यांचे जागतिक राजकारणात दूरगामी परिणाम आहेत.

जर आपण दावोस २०२६ मध्ये ट्रम्प यांच्या ७० मिनिटांच्या भाषणातील पाच मुद्द्यांचा आढावा घेतला तरः (१) ट्रम्प यांनी स्पष्टपणे सांगितले की फक्त अमेरिकाच ग्रीनलँडच्या सुरक्षेची हमी देऊ शकते आणि ग्रीनलँड अमेरिकेसाठी धोरणात्मकदृष्ट्या आवश्यक आहे. हे विधान डेन्मार्क आणि युरोपियन युनियनच्या सार्वभौमत्वावर थेट हल्ला आहे.

ग्रीनलँड केवळ आर्क्टिक प्रदेशातच नाही तर दुर्मिळ खनिजे, धोरणात्मक सागरी मार्ग आणि भविष्यातील ऊर्जा राजकारणाचे केंद्र देखील आहे. ट्रम्प यांच्या दाव्यावरून असे सूचित होते की अमेरिका आता आंतरराष्ट्रीय कायद्यापेक्षा स्वतःला वर मानण्याच्या मानसिकतेत प्रवेश करत आहे.

(२) ग्रीनलँडच्या त्यांच्या प्रस्तावित अधिग्रहणाला विरोध करण्यासाठी, ट्रम्प यांनी डेन्मार्कला कृतघ्न म्हटले. ही भाषा एखाद्या राष्ट्रप्रमुखाची नसून कॉर्पोरेट बॉस किंवा टोळीच्या नेत्यासारखी वाटते. म्हणूनच युरोपियन संसद सदस्य आणि माध्यमांनी ट्रम्प यांना आंतरराष्ट्रीय गुंड असेही म्हटले आहे. ही प्रतिमा आता केवळ टीकाच नाही तर जागतिक धारणा बनत आहे.

(३) ट्रम्प म्हणाले की आजचा कॅनडा अमेरिकेमुळे अस्तित्वात आहे आणि कॅनडाच्या पंतप्रधानांनी हे लक्षात ठेवले पाहिजे.






ॲड. किशन एस. भवानी
कर तज्ञ, स्तंभलेखक, आंतरराष्ट्रीय लेखक
गोंदिया. (महाराष्ट्र)
9284141425

हे विधान केवळ ऐतिहासिकदृष्ट्या दिशाभूल करणारे नाही तर कॅनडाच्या सार्वभौमत्वावर आणि स्वाभिमानावर थेट हल्ला आहे. म्हणूनच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांचे भाषण दावोस येथे सर्वाधिक चर्चेत आले.

मार्क कार्नी यांचे उत्तरः आदराचे राजकारण विरुद्ध खोटेपणाचे जग. मार्क कार्नी म्हणाले, आपण खोटेपणाच्या जगात राहतो, जिथे कमकुवत राष्ट्रांना शक्तिशाली राष्ट्रांसमोर नतमस्तक होण्याची अपेक्षा आहे. हे त्यांच्या हिताचे रक्षण करेल असा विश्वास गुलामगिरीचा एक प्रकार आहे आणि तो आता सहन केला जाणार नाही. त्यांचे पाच मुख्य मुद्दे स्पष्टपणे सूचित करतात की अमेरिका-केंद्रित जागतिक व्यवस्था आता तुटत आहे.

(४) ट्रम्प म्हणाले की गरज पडल्यास नाटो अमेरिकेला मदत करेल की नाही याबद्दल त्यांना शंका आहे. हे विधान नाटोसारख्या संघटनेच्या आत्म्यावर हल्ला आहे. जर अमेरिका स्वतःच स्वतःच्या युतीवर विश्वास ठेवत नसेल तर युरोपने त्यावर विश्वास का ठेवावा? लहान देशांनी सुरक्षित का वाटावे? म्हणूनच युरोप आता स्वतंत्र सुरक्षा संरचनेचा गंभीरपणे विचार करत आहे.

(५) ट्रम्प असेही म्हणाले की अमेरिका ग्रीनलँड मिळवण्यासाठी बळाचा वापर करणार नाही, परंतु हे विधान आश्वासनासारखे कमी आणि धोरणात्मक दबावासारखे जास्त वाटले. इतिहास दाखवतो अमेरिका प्रथम बळाचा वापर करण्यास नकार देते, नंतर आर्थिक दबाव, निर्बंध लागू करते आणि शेवटी लष्करी उपस्थितीद्वारे आपले ध्येय साध्य करते.

जर आपण भारत-युरोप-अमेरिका त्रिकोणाचा विचार केला तरः धोरणात्मक संतुलनाची एक नवीन चाचणी, भारत-युरोप-अमेरिका त्रिकोण हा लोकशाही मूल्ये, मुक्त व्यापार आणि सामायिक सुरक्षा हितसंबंधांवर आधारित मानला जात आहे. तथापि, ट्रम्प युगातील आक्रमक अमेरिका प्रथम धोरणाने हे संतुलन अस्थिर केले आहे. युरोप आता उघडपणे अमेरिकन दबावांना विरोध करत आहे, तर भारत या संघर्षात थेट संघर्ष टाळून धोरणात्मक स्वायत्तता राखण्याचे धोरण अवलंबत आहे.

ही परिस्थिती भारतासाठी संधी आणि आव्हान दोन्ही सादर करते. ही एक संधी आहे कारण युरोप आता भारताला एक विश्वासार्ह आर्थिक आणि राजकीय भागीदार म्हणून पाहतो आणि एक आव्हान कारण अमेरिका आता समानतेच्या अटींवर नव्हे तर अधीनतेच्या अटींवर भागीदारीचे मूल्यांकन करू इच्छित आहे. या त्रिकोणात भारताची भूमिका वाढत्या प्रमाणात संतुलित शक्तीची बनत आहे.

युरोप भारतासोबत व्यापार, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळींमध्ये सहकार्य वाढवू इच्छित आहे, तर अमेरिका भारताला त्याच्या चीनविरोधी रणनीतीमध्ये एक साधन म्हणून पाहते. या परिस्थितीत, हे स्पष्ट आहे की भारताने कोणत्याही एकाच शक्ती गटाशी संरेखित होण्याऐवजी बहु-संरेखनाचे धोरण अधिक मजबूत केले पाहिजे.

दावोस २०२६ मधील घटनांवरून असे दिसून येते की येत्या काळात भारत-युरोप संबंध अधिक दृढ होतील, तर अमेरिकेसोबतचे संबंध हितसंबंधांवर आधारित असतील परंतु सावध राहतील.

जर आपण आंतरराष्ट्रीय कायदा आणि सार्वभौमत्वाचा विचार केला तरः सत्ता विरुद्ध नियमांचा संघर्ष, आंतरराष्ट्रीय कायद्याचा मूलभूत आत्मा सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि परस्पर संमतीवर आधारित आहे. तथापि, ट्रम्प यांचे वक्तृत्व आणि दावोस येथे दिलेले विधान या तत्त्वांना आव्हान देत असल्याचे दिसून येते.

सुरक्षेच्या नावाखाली ग्रीनलँडवर दावा करणे, डेन्मार्कसारख्या सार्वभौम देशाचा अपमान करणे आणि मित्र राष्ट्रांवर दबाव आणणे हे दर्शविते की अमेरिका आता नियम-आधारित व्यवस्थेपासून शक्ती-आधारित व्यवस्थेकडे वळत आहे. ही भूमिका केवळ युरोपसाठीच नाही तर संपूर्ण जगासाठी धोकादायक उदाहरण निर्माण करू शकते.

ही परिस्थिती भारतासारख्या देशांसाठी विशेषतः संवेदनशील आहे, कारण भारताने नेहमीच आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर सार्वभौमत्व आणि हस्तक्षेप न करण्याचा पुरस्कार केला आहे. जर शक्तिशाली देशांनी उघडपणे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करण्यास सुरुवात केली तर लहान आणि मध्यम आकाराच्या देशांची सुरक्षा आणि स्वायत्तता धोक्यात येऊ शकते.

म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि बहुपक्षीय संस्थांना बळकट करण्यात भारत आणि युरोप दोघांचाही निहित स्वार्थ आहे. दावोस २०२६ हा एक स्पष्ट संकेत देतो की येत्या काळात जागतिक राजकारणातील सर्वात मोठा संघर्ष कायदा आणि सत्ता यांच्यातील असेल आणि हा संघर्ष नवीन जागतिक व्यवस्थेचा आकार निश्चित करेल.

२३ जानेवारी २०२६ रोजी संपलेल्या दावोस बैठकीबद्दल, त्यातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे युरोपीय नेते आता उघडपणे ट्रम्पचा विरोध करत आहेत, बंद दाराआड नाही तर सार्वजनिक व्यासपीठावर. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी सांगितले की युरोपने आता अमेरिकन सत्तेसमोर झुकण्याची सवय सोडली पाहिजे. ग्रीनलँड मुद्द्यावर आणि टॅरिफ धमक्यांवर ते अमेरिकेच्या दबावाला बळी पडणार नाहीत असे ब्रिटिश पंतप्रधानांनी स्पष्ट केले.


हे विधान ऐतिहासिक आहे. कारण ब्रिटन नेहमीच अमेरिकेचा सर्वात जवळचा मित्र मानला जातो. जागतिक राजकारण आता वैयक्तिक अहंकाराने चालते. अमेरिका फर्स्ट आणि वर्ल्ड फर्स्ट यांच्यातील संघर्ष स्पष्ट आहे; ट्रम्पचे अमेरिका फर्स्ट स्पष्टपणे बहुपक्षीय संस्था, आंतरराष्ट्रीय नियम आणि सामायिक जबाबदाऱ्यांविरुद्ध आहे.

याउलट, युरोप आणि कॅनडा आदर, भागीदारी आणि संतुलनाबद्दल बोलत आहेत. दावोस २०२६ हे सूचित करते की अमेरिकेचे निर्विवाद नेतृत्व संपत आहे. जग बहुध्रुवीय होत नाही, तर विखुरलेले आहे. हा बदल नवीन संतुलनाकडे नाही तर अनिश्चितता आणि संघर्षाकडे निर्देश करतो.

म्हणून, जर आपण वरील संपूर्ण वर्णनाचा अभ्यास आणि विश्लेषण केले तर आपल्याला आढळेल की दावोस २०२६ हा इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. दावोस २०२६ ही केवळ एक परिषद नाही, तर अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांमधील विश्वास तुटल्याचा एक दस्तऐवज बनला आहे.

डोनाल्ड ट्रम्पची आक्रमक भाषा, युरोपचा उघड प्रतिकार आणि कॅनडा आणि ब्रिटनचा स्पष्ट असहमत हे सर्व संकेत आहेत की जुनी जागतिक व्यवस्था आता टिकाऊ नाही. जग नवीन नेतृत्वाकडे नाही तर नवीन संघर्ष आणि नवीन वास्तवाकडे वाटचाल करत आहे. हे केवळ ट्रम्प युग नाही तर एका युगाच्या समाप्तीचे लक्षण आहे.

# कला-साहित्य भूषण पुस्तक गुणी स्नेहीजनांचा कौतुक सोहळा..!




मित्रवर्य देवेंद्र भुजबळ यांचं कला -साहित्य भूषण हे पुस्तक म्हणजे त्यांच्या, या आधी प्रसिद्ध झालेल्या गगनभरारी, समाजभूषण, आम्ही अधिकारी झालो, माध्यमभूषण आदी पुस्तकांच्या विषय अन विचार प्रवाहाशी नातं सांगणारी, विविध क्षेत्रातील ज्ञात-अज्ञात गुणी-कर्तृत्ववान मंडळी च्या कारकीदीर्चा सुंदर, भावपूर्ण लेखाजोखा मांडणारी, एक यशोगाथा आहे. दूरदर्शनच्या व पुढे माहिती खात्याच्या नोकरीमुळे व कार्यक्रम निर्मितीच्या निमित्ताने, या पुस्तकातील ज्या नामवंत कलाकार, गायक, साहित्यिक-कवी, चित्रकार, समाजसेवक, लोककलावंत मंडळीच्या कलागुणावर, त्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमावर, संघर्षमय कारकीर्दीवर भुजबळ यांनी विविध संस्मरणे विविध लेखाद्वारे लिहिली आहेत, त्यातील गझल गायक भीमराव पांचाळे, कवी विसुभाऊ बापट, गायिका मृदुला दाढे जोशी, लेखिका प्रतिभा सराफ, सिने पत्रकार- लेखक अशोक राणे, लोककलावंत डॉ गणेश चंदनशिवे आदी बहुसंख्य मंडळींच्या कलागुणाशी मी परिचित असून त्यातील कलाकार जयंत ओक, निर्माती मीना गोखले पानसरे, कॅमेरामन अजित नाईक आदी मंडळी तर दूरदर्शन मध्ये माझे सहकारी म्हणून कार्यरत होते. या सर्वांच पुस्तक रूपाने कौतुक होत आहे याचा विशेष आनंद आहे.

रविराज गंधे
निवृत्त दूरदर्शन निर्माता, मुंबई.
9869484800

सर्वसाधारणपणे नामवंत- प्रसिद्ध व्यक्तीवर सर्व लेखकांना लिहायला अन वाचकांना ते वाचायला आवडते. परंतु ह्या व्यक्तीबरोबरच भुजबळ यांनी, फारशा परिचित किवा लोकप्रिय नसलेल्या असंख्य गुणी कलावंत, शिक्षणतज्ञ, समाजसेवक, अधिकारी आदी विविध क्षेत्रात सचोटीने कार्य करून यश संपादन केलेल्या व्यक्तीवर गौरवपर लेख लिहिताना, त्यांच्या सहवासातील आठवणी देखील लिहिल्या आहेत. त्यातून या मंडळी मधील सुजाण माणसाच दर्शन होते.

सर्वसाधारणपणे पुण्या, मुंबईतील कलावंत मंडळी हि माध्यमस्नेही असतात त्यामुळे त्यांच्या कलागुणांना सर्व माध्यमात चांगली प्रसिद्धी मिळते. परंतु छोट्या गावात- शहरात निष्ठेने काम करणाऱ्या - आपले छन्द जोपासत कार्यरत असणाऱ्या लोकांची फारशी दखल घेतली जात नाही. त्यांच्या वाट्याला काहीशी उपेक्षा येते.या पुस्तकाच्या रूपाने अशा मंडळींचं कार्य अन गुणविशेष वाचकांसमोर आणण्याचं मोलाचं काम भुजबळ यांनी केले आहे ते दखलपात्र आहे.

लोक कलावंत आणि सुरेश भटांचे निकटचे स्नेही शाहीर वैराळकर, कवयित्री विजयलक्ष्मी मणेरीकर, विविध वेशभूषा करून मनोरंजनातून उद्बोधनाचे कार्यक्रम करणारा वरप्रभ शिरगावकर उर्फ चार्ली, चित्रकार-लेखिका शिल्पा गम्पावार,अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रिय भारुडकार हमीद सय्यद, निवेदक-हास्यकलाकार बंडा जोशी, आधी शासनाचे आणि आता शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी म्हणून लौकिक मिळवणारे डॉ आलोक जत्रातटकर , लेखिका-पत्रकार डॉ उषा रामवाणी गायकवाड, अहिल्यानगर मधील नाट्य कलावंत डॉ शाम शिंदे आदी समाजाच्या विविध थरातील अनेक यशस्वी गुणी मंडळीनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आपल्या अंगभूत गुणांचा विकास करून विबिध कला अन क्षेत्रात यश संपादन केल.

या सर्वांची जीवनगाथा, संघर्ष अन जीवनानुभव हर्दयस्पर्शी शब्दात भुजबळ यांनी शब्दबद्ध केले आहे.ज्या मंडळींवर भुजबळ यांनी लेख लिहिले त्यांच्या कायार्ची, पुरस्काराची,विविध पदांची माहिती आपल्या लेखात दिली आहे.ती आटोपशीर करता आली असती. अर्थात या लोकांच्या कायार्ची अन गुणवत्तेची वाचकांना या पुस्तकाद्वारे ओळख होते आहे हे महत्वाचे !

शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर भुजबळ आणि त्यांच्या पत्नी अलका यांनी न्यूज स्टोरी टुडे हे पोर्टल सुरु केले. याद्वारे देश विदेशातील विविध क्षेत्रातील लोकांना लिहित केले. त्यांच्या साहित्यावर पुस्तके छापून प्रकाशित केली. त्यांनी स्वतःचा असा वाचक अन लेखकवर्ग तयार केला हि बाब अभिनंदनीय आहे.मुळात या सर्व मंडळी विषयी आपुलकीची अन प्रेमाची भावना बाळगून त्याचं कौतुक करण्याचा दिलदारपणा अन मैत्र जपण्याची असोशी भुजबळ यांच्या लेखन शैलीत जाणवते आणि हेच त्यांच्या लेखनाचे बलस्थान आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!

■ ■ ■

# : राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०: शैक्षणिक सुधारणा की धोरणात्मक दिखावा?

राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० (NEP 2020) सादर करताना ते देशातील शिक्षणव्यवस्थेला २१ व्या शतकात नेणारे ऐतिहासिक धोरण असल्याचा मोठ्या प्रमाणावर गाजावाजा करण्यात आला. कौशल्याधारित शिक्षण, उद्योग- शैक्षणिक क्षेत्रातील समन्वय, बहुविषयक अभ्यासक्रम, लवचिक शिक्षणपद्धती, संशोधनाभिमुख शिक्षण अशा अनेक आकर्षक संकल्पनांचा पाऊस पाडण्यात आला. मात्र, या धोरणाच्या अंमलबजावणीला पाच वर्षांचा कालावधी उलटूनही प्रत्यक्ष वास्तव मात्र अत्यंत निराशाजनक आहे. आदेश आहेत, परिपत्रके आहेत; पण इच्छाशक्ती नाही, निधी नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नियमित भरती नाही.

----------------

याच पार्श्वभूमीवर प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस ही संकल्पना पुढे आली. उद्योग, प्रशासन, समाजकार्य, तंत्रज्ञान, पत्रकारिता, कायदा, व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांतील अनुभवी व्यावसायिकांना विद्यापीठांमध्ये अध्यापनासाठी सहभागी करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाचा लाभ मिळावा, हा या संकल्पनेमागील मूळ उद्देश होता.

विद्यापीठ अनुदान आयोगाने यासाठी स्पष्ट नियमावली जाहीर करून विद्यापीठांना मंजूर अध्यापन पदांपैकी किमान १० टक्के पदे PoP अंतर्गत भरणे अनिवार्य केले. महाराष्ट्र शासनानेही याबाबत आदेश काढून तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे.

तरीही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, गडचिरोली, अमरावती आणि सोलापूर यांसारख्या प्रमुख विद्यापीठांनी अद्याप या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही, ही बाब अत्यंत धक्कादायक आहे.

याच पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यापीठांकडून लेखी स्पष्टीकरण मागवले जाईल असे वक्तव्य केले. परंतु इथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, हीच तत्परता ९० टक्के रिक्त असलेल्या नियमित अध्यापन पदांच्या बाबतीत का दिसत नाही?

आज महाराष्ट्रातील शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये हजारो अध्यापन पदे रिक्त आहेत. पात्र उमेदवार एम.ए., एम.फिल., पीएच.डी., नेट-सेट उत्तीर्ण होऊन दहा-दहा, बारा-बारा वर्षे नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. वयोमर्यादा वाढत आहे, संधी मिळत नाही, त्यामुळे मानसिक ताण, नैराश्य वाढत चालले आहे. प्रत्येक अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले जातात. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ह्लवकरच भरती करूह्व अशी आश्वासने देतात; पण प्रत्यक्षात ना शासन निर्णय निघतो, ना भरती प्रक्रिया सुरू होते, ना निधीची ठोस तरतूद होते.

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक संघटना, नुटा, तसेच महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेचे सचिव डॉ. प्रवीण रघुवंशी यांच्यासारखे प्रतिनिधी सातत्याने पत्रव्यवहार करतात, बैठकीत मुद्दे मांडतात, आंदोलनांचा इशारा देतात, तरीही शासनाला जाग येत नाही. मग प्रश्न निर्माण होतो, सरकारला जाग येते ती केवळ १० टक्के PoP पदांसाठीच का?

जर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार विद्यापीठांना तज्ज्ञांची गरज आहे, तर ती गरज केवळ १० टक्क्यापुरतीच मर्यादित आहे का? ९० टक्के नियमित, पात्र, प्रशिक्षित प्राध्यापकांची गरज संपली आहे का?



प्रा. डॉ. प्रशांत विघे
सिनेट सदस्य
संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती.
९३२६८७७७४९

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे केवळ काही निवडक प्रयोगांसाठी आहे की संपूर्ण शिक्षणव्यवस्थेसाठी?

आज राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० अंतर्गत बहुविषयक अभ्यासक्रम, नवे विषय, कौशल्याधारित कोर्सेस, मूल्यशिक्षण आणि संशोधनाभिमुख अध्यापनाची अपेक्षा व्यक्त केली जाते. मात्र त्यासाठी आवश्यक असलेली मानवसंपदा, पायाभूत सुविधा आणि आर्थिक तरतूद कुठे आहे?

शिक्षकच नसतील तर वाढवलेले अभ्यासक्रम कोण शिकवणार? कागदावर अभ्यासक्रम वाढवून आणि प्रत्यक्षात वर्ग रिकामे ठेवून शिक्षणाचा दर्जा कसा सुधारणार? हीच परिस्थिती शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही तितकीच गंभीर आहे.

२०१२ पासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियमित भरती जवळजवळ थांबलेली आहे. हा प्रशासकीय अपघात आहे की जाणीव पूर्वक स्वीकारलेले धोरण, हा प्रश्न आता टाळता येणार नाही.

शिक्षकेतर कर्मचारीच नसतील तर स्वच्छता, कार्यालयीन व्यवहार, परीक्षा व्यवस्थापन, ऑनलाइन प्रक्रिया, वेतन बिले, शिष्यवृत्तीचे काम कोण करणार? शिक्षकांनी अध्यापन करायचे की लिपिक, शिपाई, संगणक ऑपरेटरची कामे सांभाळायची? आणि या सवार्साठी लागणारी आर्थिक तरतूद नेमकी कोणाच्या जबाबदारीची आहे?

एकीकडे राज्यात अंदाजे ४० ते ४५ टक्के पदे रिक्त असल्याचे मान्य केले जाते, तर दुसरीकडे केवळ ४०%, ६०% किंवा ८०% पदेच भरण्याची परवानगी दिली जाईल, जागा भरतीला मान्यता देत असतांना दहा वर्षांपूर्वीच्या कालबाह्य संचमान्यतेच्या आधारे दिली जाईल, हा निर्णय वास्तवाधारित आहे की केवळ आर्थिक काटकसरीच्या नावाखाली शिक्षण व्यवस्थेचा गळा आवळण्याचा प्रयत्न आहे? समजण्याच्या पलीकडे हे विदारक वास्तव आहे

या सर्व पार्श्वभूमीवर असे स्पष्टपणे म्हणावे लागेल की, राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा प्रवास सध्या शैक्षणिक सुधारणेपेक्षा प्रशासकीय दिखाव्याकडे अधिक झुकलेला दिसतो. शिक्षण केवळ परिपत्रके, आदेश, समित्या आणि अहवालांमध्ये अडकून पडले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य, त्यांची रोजगारक्षमता आणि बौद्धिक विकास याबाबत गांभीर्य दिसत नाही.

जर प्रत्यक्षात, रिक्त पदभरती, अनुदान आणि मनुष्यबळाचा प्रश्न प्राधान्याने सोडवला गेला नाही, तर राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा अपेक्षित ह्यआऊटपुटह्ल काय असेल ? याचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. अन्यथा हे धोरण शिक्षणव्यवस्थेला दिशा देण्याऐवजी तिची दिशाभूल करणारे ठरेल.

एकंदरीत सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, पालक आणि अभ्यासकांच्या मनात एकच प्रश्न घुमत आहे. १० टक्के प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिससाठी जर शासन जागे होते, तर ९० टक्के नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी कधी जाग येणार? हा प्रश्न केवळ धोरणाचा नाही, तर भविष्यातील पिढ्यांच्या शैक्षणिक हक्कांचा आहे. याचे उत्तर आज दिले नाही, तर उद्या इतिहास नक्कीच त्याचा हिशेब मागेल हे मात्र निश्चित!

■ ■ ■

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन.

स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ. होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ. भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे जगभर भारताचे नाव झाले.

डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ. जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती. त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती. त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ. होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते. पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले.

वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली. पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती. या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे, शिष्यवृत्त्या मिळवल्या.



१९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ. होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली.

या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. १९५६ साली आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ. होमी जहांगीर भाभा यानांच जाते.

अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ. भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले.

२४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या मॉं ब्लॅं या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन! ■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### धन आम्हा मृत्तिकेसमान..

दीन दुखितांचे संत होते कैवारी
आजचे बाबा धनिकांचे पुढारी
दर्शना साठी मोजावी लागते फी
गरीबांना दुर्लभ आहे दर्शन फ्री

तुकोबाराय असती संत महान
म्हणती धन आम्हा मृतिके समान
आधूनिक बाबांचा
मानधना वर डोळा
गरीबां बद्दल दिसेना कळवळा

लोहाला परिस स्पर्शून जाणे
तैसे संत सहवासे जिवणाचे सोने
संत उपदेश असे संजिवणी
ग्रहण करता कल्याण जिवनी..

# अदाणी टोटल गॅस ची क्यू३ व ९एम एफवाय२६ मध्ये दमदार कामगिरी

**अहमदाबाद, २३ जानेवारी :** भारतातील अग्रगण्य ऊर्जा संक्रमण कंपनी अदाणी टोटल गॅस लिमिटेड (एटीजीएल) ने ३१ डिसेंबर २०२५ रोजी समाप्त तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी (क्यू३ व ९एमएफवाय२६) आपल्या कार्यात्मक, पायाभूत आणि आर्थिक कामगिरीचे निकाल जाहीर केले. कंपनीने व्हॉल्यूम, महसूल आणि ईबीआयटीडीए मध्ये दहापट टक्केवारीतील भक्कम वाढ नोंदवली आहे. क्यू३ एफवाय२६ दरम्यान एटीजीएल ने सीएनजी आणि पीएनजी चा एकत्रित २८९ एमएमएससीएम व्हॉल्यूम नोंदवत वर्षानुवर्षे १२% वाढ साध्य केली. कंपनीने १८ नवीन स्टेशन सुरू करून सीएनजी नेटवर्क ६८० स्टेशनपर्यंत वाढवले. पीएनजी घरगुती कनेक्शनमध्ये ३४,२१० नवीन जोडण्यांसह एकूण संख्या १०.५ लाख घरांपर्यंत पोहोचली. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांची संख्या ९,७५१ वर पोहोचली असून स्टील पाइपलाइन नेटवर्कची लांबी सुमारे १४,८६२ इंच-किमी झाली आहे. आयओएजीपीएल संयुक्त उपक्रमासह पॅन-इंडिया स्तरावर, एकत्रित व्हॉल्यूम १५% वाढून ४६० एमएमएससीएम झाला, १,१२० सीएनजी स्टेशन आणि १२.५ लाखांहून अधिक पीएनजी घरांना सेवा देत दररोज ४० लाखांहून अधिक नागरिकांना लाभ मिळत आहे.

आर्थिक कामगिरीतही कंपनीने मजबूत वाढ कायम ठेवली. क्यू३ एफवाय२६ मध्ये ऑपरेशन्समधील महसूल १७% वाढून १,६३१ कोटी झाला, ईबीआयटीडीए १५% वाढून ३१३ कोटी झाला, तर पीएटी १०% वाढून १५७ कोटी झाला. ९एमएफवाय२६ साठी महसूल १९% वाढून ४,६९२ कोटी, ईबीआयटीडीए ९१६ कोटी आणि पीएटी ४८१ कोटी राहिला. एकत्रित पीएटी अनुक्रमे १५९ कोटी (क्यू३) आणि ४८७ कोटी (९एम) नोंदवला गेला. कंपनीच्या ई-मोबिलिटीव्यवसायानेही प्रगती करत २६ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील २२६ शहरांमध्ये ४,९०८ ईव्ही चार्ज पॉइंट्स आणि सुमारे ५१ मेगावॅट क्षमतेपर्यंत विस्तार केला. बायोमास विभागाने १,२१८ मेट्रिक टन सीबीजी विक्री केली आणि सेंद्रिय खत विक्रीत लक्षणीय वाढ नोंदवली.

या तिमाहीत उद्योगासाठी सकारात्मक ठरलेल्या काही धोरणात्मक बदलांचाही फायदा झाला. गुजरातबाहेरील नैसर्गिक वायू पुरवठ्यावर व्हॅट ऐवजी २% सीएसटी लागू करण्यात आला तसेच तीन झोनच्या ऐवजी दोन झोनचे सुलभ ट्रान्समिशन टॅरिफ लागू झाले, ज्यामुळे खर्च संरचना अधिक मजबूत झाली. एपीएम गॅसची उपलब्धता कमी असतानाही आणि हेन्री हब-लिंक्ड आरएलएनजी किंमती वाढूनही कंपनीने विविध स्रोतांद्वारे अखंड पुरवठा कायम ठेवला. शाश्वततेच्या दृष्टीने एटीजीएल ला सीडीपी ए रेटिंग आणि एस अँड पी डॉव जोन्स सस्टेनेबिलिटी इंडेक्स मध्ये ७२ गुण मिळवत जागतिक स्तरावर गॅस युटिलिटी क्षेत्रात ९वा क्रमांक प्राप्त झाला. तसेच इंडिया सुरक्षा पुरस्कार मध्ये सुरक्षा उत्कृष्टतेसाठी सुवर्ण पुरस्कार मिळाला.

# सूक्ष्म उद्योगांमुळे या क्षेत्रातील बहुतांश तणाव निर्माण होत असल्याने, महाराष्ट्र हे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी कर्जाचे एक प्रमुख केंद्र बनून राहिले आहे: एमएसएमई संपर्क

**मुंबई, २३ जानेवारी :** यूग्रो कॅपिटल आणि डॅन अँड ब्रॅडस्ट्रीट इंडिया यांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या एमएसएमई संपर्क अहवालाच्या चौथ्या आवृत्तीनुसार, उद्योगांच्या सर्वात लहान घटकांमध्ये आव्हाने कायम असतानाही, महाराष्ट्राची भारताच्या एमएसएमई कर्ज प्रणालीमध्ये मध्यवर्ती भूमिका कायम आहे.

अहवालात असे अधोरेखित केले आहे की, एमएसएमईसाठी एकूण कर्ज उपलब्धता आणि औपचारिकरणामध्ये लक्षणीय सुधारणा झाली असली तरी, राष्ट्रीय स्तरावर एमएसएमईच्या एकूण अनुत्पादक कर्जांपैकी (एनपीए) जवळपास ६५% वाटा सूक्ष्म उद्योगांचा आहे, जे या क्षेत्रातील असमान पुनर्प्राप्ती दर्शवते. महाराष्ट्रसह व्यापार, उत्पादन आणि सेवा-आधारितएमएसएमईची मोठी संख्या असलेल्या राज्यांमध्ये, वाढत्या कर्ज उपलब्धतेसोबतच सूक्ष्म स्तरावरील तणावाचा हा दुहेरी कल दिसून येतो.

अखिल भारतीय स्तरावर, उद्यम नोंदणींची संख्या ६.८ कोटींच्या पुढे गेली आहे आणि गेल्या पाच वर्षांत एमएसएमईचे थकित कर्ज जवळपास अडीच पटीने वाढले आहे, जे लहान व्यवसायांसाठी औपचारिक वित्तपुरवठ्याच्या संरचनात्मक सखोलतेचे संकेत देते. उत्पादन, सेवा आणि व्यापार या क्षेत्रांमधील विविध प्रकारच्या एमएसएमईंच्या आधारावर, महाराष्ट्र या कर्ज विस्तारातील प्रमुख योगदानकर्त्यांपैकी एक आहे.

या निष्कर्षांवर भाष्य करताना, यूग्रो कॅपिटलचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक शचिंद्र नाथ म्हणाले, भारताची एमएसएमई कर्जाची कहाणी मूलभूतपणे सकारात्मक आहे, जी औपचारिकरण, डेटा-आधारित कर्ज मूल्यांकन आणि वित्तपुरवठ्याच्या वाढत्या उपलब्धतेमुळे प्रेरित आहे. पुढील वाढीचा टप्पा आपण सूक्ष्म उद्योगांना किती जबाबदारीने पाठिंबा देतो, आणि योग्य संरचना, किंमत आणि शिस्तीसह त्यांच्यापर्यंत कर्ज पोहोचेल याची खात्री करतो, यावर अवलंबून असेल.

हा अहवाल निर्यात-संबंधितएमएसएमईमध्ये, विशेषतः जागतिक मागणीतील अस्थिरतेला सामोरे जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये, तणावाची सुरुवातीची चिन्हे देखील दर्शवतो, जो संतुलित कर्ज मूल्यांकन आणि क्षेत्रीय जोखीम मूल्यांकनाच्या महत्त्वावर जोर देतो.

हा अहवाल डॅन अँड ब्रॅडस्ट्रीट इंडिया (http://www.??nb.co.in/) आणि यूग्रो कॅपिटल (http://www.ugrocapital.com/) यांच्या वेबसाइटवरून विनामूल्य डाउनलोड केला जाऊ शकतो.

## शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी अझीम प्रेमजी विद्यापीठाचे पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश सुरू

**मुंबई, २३ जानेवारी :** अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात (कॅम्पस) शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू केल्याची घोषणा केली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन) अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका, शैक्षणिक मूल्यमापनामध्ये पदव्युत्तर पदविका, अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना शिकवण्यासाठी पदव्युत्तर पदविका आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे.

हा एक वर्षाचा अर्धवेळ पदविका अभ्यासक्रम असून, यामध्ये सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम मिश्र स्वरुपात (ऑनलाइन आणि कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष सत्रे) राबवला जाईल. नियमित शालेय क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांच्या उच्च-गुणवत्तेच्याव्यावसायिक विकासासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

हा पदविका अभ्यासक्रम शिक्षण क्षेत्रातील कार्यरत शिक्षकांसाठी तयार करण्यात आला आहे. त्यासाठी शालेय शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षकविशेष शिक्षक, शालेय पदाधिकारी, सरकारी संस्था, खासगी संस्था किंवा शालेय प्रणालीशी संबंधित स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक अर्ज करू शकतात.

अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशनचे संचालक अंकुर मदन म्हणाले, हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, अध्ययन अक्षमता आणि मूल्यमापन यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन प्रदान करतात. हे अभ्यासक्रम अशा प्रकारे डिझाईन करण्यात आले आहेत की, ज्यामुळे कार्यरत शिक्षक/शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे शिक्षण मुले आणि सहकाऱ्यांबरोबरच्या दैनंदिन व्यवहारात वापरता येईल. तसेच, स्वतःच्या कामातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा चिकित्सकपणे विचार करण्यास आणि त्यांची उत्तरे शोधण्यासही हे अभ्यासक्रम त्यांना प्रोत्साहित करतात.

# इएलएसएसला डीएसपी म्युच्युअल फंडाकडून नवी प्रतिमा प्रदान

**मुंबई, २३ जानेवारी :** भारतीय गुंतवणूकदारांना पूर्वीच्या तुलनेत समभागांशी संबंधित अनेक गुंतवणूक पर्याय आता सहज उपलब्ध असले तरी शेअरबाजाराच्या चढउतारात सतत गुंतवणूक करत राहणे, ही कायम आव्हानात्मक बाब असते. डीएसपी म्युच्युअल फंडाने दीर्घकालीन गुंतवणूकीबाबत एक नवीन दृष्टिकोन मांडला आहे. इक्विटी लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम्स (इएलएसएस) या फंड योजना प्रामुख्याने कर-बचतीचेपर्याय म्हणून नव्हे तर दीर्घकालीन गुंतवणुकीत वर्तनाचा पडणारा प्रभाव दूर करण्यास सहाय्य करणारा पर्याय आहे, हा नवा दृष्टीकोन इएलएसएसबाबत गुंतवणूकदारांसमोर आणला आहे.

गुंतवणूकदारांच्या वाढत्या वर्गासाठी कलम ८० सीअंतर्गतच्या करबचतीला आता फारसे महत्व राहिलेले नाही. त्यामुळे अलिकडच्या काही वर्षांत गुंतवणूकदारांमध्ये इएलएसएसबाबतची लोकप्रियता कमी होत चालली आहे. तथापि, डीएसपी म्युच्युअल फंडाचा असा विश्वास आहे की, विविध कारणास्तव करबचत करणे आवश्यक असले तरी इएलएसएसची रचनात्मक वैशिष्ट्ये, विशेषतः तीन वर्षांसाठी गुंतवणूक कायम ठेवण्याची सक्तीचे महत्व आजच्या काळातही टिकून आहे.

गुंतवणूकदारांच्या निर्णयावर गुंतवणूक पर्याय निवडीचा प्रभाव फार कमी असतो. मुख्यतः त्यांच्या वर्तनाचाच अधिक प्रभाव पडत असतो, या महत्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधताना डीएसपी म्युच्युअल फंडाच्या कंझ्युमर ग्रोथ मार्केटिंगचे प्रमुख मनीष राठी म्हणाले. अस्थिरतेच्या काळात गुंतवणूकदार गुंतवणूक लवकर काढून घेतात, बाजाराच्या गतीचा पाठलाग करण्याचा अनाठायी प्रयत्न करतात किंवा बाजारात अल्पकालावधीत गोंधळाचे वातावरण असताना या वातावरणाला अनुसरून घाईने

निर्णय घेतात. इएलएसएसचे लॉक-इनवैशिष्ट्य अर्थात मुदतसक्तीचे वैशिष्ट्य गुंतवणूकदारांना बाजाराच्या चढउतारांदरम्यान सतत गुंतवणूकशील राहण्यास प्रोत्साहित करते आणि अशा गोंधळात कोणतेही पाऊल उचलण्याच्या प्रवृत्तीला मज्जाव करु शकतात.

डीएसपीने संकलित केलेल्या अंतर्गत आकडेवारीच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, डिजिटल स्वरुपातील आणि विशेषतः स्वनिर्णयावर आधारित समभागात गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तींचा स्वतःची गुंतवणूक कायम ठेवण्याचा सरासरी कालावधी (होल्डिंग) केवळ अडीच वर्षे इतकाच आहे. दीर्घकाळात संपत्ती निर्मितीच्या उद्दीष्टासाठी आवश्यक असलेल्या कालावधीपेक्षा हा कालावधी कितीतरी पटीने कमी आहे. अशा स्थितीत ईएलएसएसमध्ये तीन वर्षासाठी गुंतवणूक कायम ठेवण्याची असलेली सक्ती (लॉक-इन)आणि हा फंड विविध क्षेत्रातील समभागांत करत असलेल्या गुंतवणूकीमुळे त्याची रचना आणि ऐतिहासिक लाभ हे फ्लेक्सिकॅप-शैलीतीलइक्विटी योजनांप्रमाणेच आहे. परंतु त्याचबरोबर हे फंड गुंतवणूकीला शिस्तचीही जोडही देतात.

यामुळेच आजच्या गुंतवणूकदारांसाठी इएलएसएसची उपयुक्तता आजही टिकून आहे, हे स्पष्ट करत राठी पुढे म्हणाले, बाजारातील अल्पकालीन चढउतारांना प्रतिसाद देण्याचा नैसर्गिक कल बहुतांश व्यक्तींमध्ये असतो आणि अशाचवेळी गुंतवणूकदारांना अधिकाधिक काळ गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करणाऱ्या गुंतवणूक उत्पादनाची रचनाच त्यांच्यासाठी यशाची शक्यता वाढवू शकते.

जानेवारी-मार्चचा कालावधीत करबचतीसाठी लक्ष केंद्रित झालेले असते. त्यासाठी बहुतांश वेळा इएलएसएसचा विचार केला जातो. म्हणजे हंगामी तसेच एकरकमी गुंतवणूक पर्याय हा पारंपारिक दृष्टीकोन इएलएसएसबाबत तयार झालेला आहे.

परंतु डीएसपीचा नवा दृष्टिकोन या पारंपारिक दृष्टीकोनाला छेद देतो. डीएसपी म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांना इएलएसएसकडे नियमित गुंतवणूक योजना (एसआयपी) या दृष्टिकोनातून पाहण्यास प्रोत्साहित करत आहे. त्यामुळे करबचतीसाठी गुंतवणूक करण्याऐवजी वर्षभर गुंतवणूकीचा पर्याय म्हणूनही हा फंड कार्य करू शकतो.

## ॲक्सिस म्युच्युअल फंडातर्फे ॲक्सिस बीएसई इंडिया सेक्टर लीडर्स इंडेक्स फंड सादर

**मुंबई, २३ जानेवारी :** भारतातील आघाडीच्या मालमत्ता व्यवस्थापन कंपन्यांपैकी एक असलेल्या ॲक्सिस म्युच्युअल फंडातर्फे बीएसई इंडिया सेक्टर लीडर्स इंडेक्स फंड ही त्यांची नवीन फंड ऑफर सादर करण्यात आली आहे. हा एक ओपन-एंडेड इंडेक्स फंड असून तो बीएसई इंडिया सेक्टर लीडर्स इंडेक्स मधील घटकांमध्ये गुंतवणूक करतो. या फंडाचा एनएफओ २३ जानेवारी २०२६ रोजी सदस्यत्वासाठी खुला होईल आणि ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होईल. या फंडाचे व्यवस्थापन कार्तिक कुमार (फंड व्यवस्थापक) करणार आहेत. किमान गुंतवणूक रक्कम १०० रु. इतकी आहे. हा फंड गुंतवणूकदारांना दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचा उपाय पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवतो. हा नवीन फंड गुंतवणूकदारांना बीएसई ५०० इंडेक्स मधील २१ क्षेत्रांमधील भारतातील आघाडीच्या कंपन्यांमध्ये व्यापक बाजारातील सहभाग मिळवून देण्यासाठी एक सूज्ञ मार्ग उपलब्ध करून देतो. या फंडातील घटकांमध्ये बीएसई ५०० इंडेक्स मध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रत्येक २१ क्षेत्रांमधील सरासरी सहा महिन्यांच्या दैनंदिन एकूण बाजार भांडवलावर आधारित अग्रणी तीन कंपन्यांचा समावेश असेल. यामुळे गुंतवणूकदारांना भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांतील प्रस्थापित बाजारपेठ अग्रणीपर्यंत पोहोच मिळते. हा फंड गुंतवणूकदारांना निर्देशांकातील केवळ प्रबळ क्षेत्रांमध्येच नव्हे तर अर्थव्यवस्थेतील विशेष आणि वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांमध्येही योगदान देण्यास मदत करतो.

फंडाच्या सादरीकरणाबाबत बोलताना ॲक्सिस एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बी. गोपकुमार म्हणाले, बाजार विकसित होत असताना गुंतवणूकदार नाविन्यपूर्ण गुंतवणूक उपाय शोधत आहेत. ॲक्सिस म्युच्युअल फंडामध्ये आम्हाला विश्वास आहे की जे उद्योग आपल्या क्षेत्रात आघाडीवर असतात, ते मजबूत मूलभूत घटक आणि लवचिकता दर्शवतात. ॲक्सिस बीएसई इंडिया सेक्टर लीडर्स इंडेक्स फंड वैविध्यपूर्ण चौकटीद्वारे त्यांच्या स्वतःच्या क्षेत्रातील आघाडीच्या आणि विश्वासार्ह कंपन्यांपर्यंत पोहोचतो.

# आयसीएच नेक्स्ट और पेक्लर्स पॅरिस ने२ अब्जडॉलरपेक्षा अधिक अशा व्हाइट स्पेसला संबोधित करण्यासाठी भारत-प्रथमग्लोबल्लोकलट्रेंडइंटेलिजन्स सर्व्हिसची घोषणा केली



**नवीदिल्ली, २३ जानेवारी :** आयसीएच नेक्स्टया भारताच्या आघाडीच्या स्वदेशी ट्रेंड फोरकास्टिंग प्लॅटफॉर्मने आज पेक्लर्स पॅरिस सोबत भागीदारीची घोषणा केली. पेक्लर्स पॅरिस एकजागतिक कन्सल्टिंग एजन्सी आहे, जी क्रिएटिव्ह स्ट्रॅटजी आणि फ्यूचर ट्रेंड्सच्या माध्यमातून ब्रँड्सना आपले भविष्य बनवण्यास मदत करते.ही भागीदारी वेस्टर्नफॅशन श्रेणीत आयसीएच नेक्स्ट पेक्लर्स पॅरिस ट्रेंडफोरकास्ट रिपोर्ट्सच्या लॉन्चचे प्रतीक आहे. या रिपोर्ट्सचा उद्देश भारतातील फॅशन आणि लाइफस्टाइल ईकोसिस्टममध्ये पूर्वीपासून चालत आलेली रिसर्च-प्रेरित,भारत-फर्स्ट ट्रेंड इंटेलिजन्सची मोठी उणीव पूर्ण करण्याचा आहे. असा रिसर्च-प्रेरित,भारत-फर्स्टट्रेंड इंटेलिजन्स, जो भारतीय उपभोक्ता आणि बिझनेस वास्तवास ध्यानात ठेवून तयार केला असेल. भारताचा फॅशन आणि लाइफस्टाइल बाजार २४० अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक असल्याचे अनुमान आहे आणि तो दर साल १०% पेक्षा जास्त दराने वाढत आहे. असे असूनही, या उद्योगातील मोठा भाग अजूनही जागतिक ट्रेंड रिपोर्ट्सवर आधारित आहे.

आयसीएच नेक्स्ट च्या सह-संस्थापकअनुराधा चंद्रशेखर आणि कनिका वोहरा म्हणाल्या, भारतात ट्रेंड फोरकास्टिंगसाठी एक स्थानिक दृष्टिकोन गरजेचा आहे. कारण येथील बाजार एकसारखा नाही तसेच तो तत्परतेने पश्चिमचे अनुकरण करणारा नाही. इथे उपभोक्त्यांचे विविध वर्ग आहेत, सणवारांशी संबंधित मागणी चक्रं आहेत, प्रदीर्घ ग्रीष्मकाल आहे आणि रंग, सिल्यूट आणि प्रसंगांशी सखोल सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत, ज्यावरून हे नक्की होते की ट्रेंड्सचा अंगिकार कसा करावा. शिवाय, भारत आता केवळ जागतिक ट्रेंड्स स्वीकारणारा देश राहिलेला नाही, तर तो त्यांना सक्रियतेने नवा आकार बहाल करतो. टेक्नॉलॉजी आणि डिजिटल व्यवहारांपासून ब्यूटी रिचुअल्स आणि फॅशन एस्थेटिक्सपर्यंत आपला देश हा इनोव्हेशन आणि प्रभाव यांचा एक मोठा स्रोत बनत चालला आहे, जेथे स्वदेशी ब्रँड्स, क्रिएटर्स आणि उपभोक्ता नवीन सांस्कृतिक संकेत घडवत आहेत.

त्यांनी पुढे म्हटले, याच कारणाने, भारतासाठी आता ट्रेंड फोरकास्टिंग केवळ अनुवादापुरते राहिलेले नसून त्यास मौलिक सर्जनाच्या दृष्टीने पुढे न्यावे लागणार आहे. इथला बाजार आता स्वतः स्वतःची मानके निर्धारित करण्यासाठी सज्ज आहे,जेणेकरून ब्रँड्स भारतीय मागणीचे उचित उत्तर देण्याबरोबरच हे देखील ओळखू शकेल की, जागतिक सांस्कृतिक आणि व्यावसायिक ट्रेंड्सच्या आगामी लाटेचे नेतृत्व भारत कसे आणि कुठून करेल. या उद्योगाला एका अशा संशोधन भिंगाची आवश्यकता आहे, जे स्थानिक संस्कृतीत रुजलेले असेल, डेटा द्वारा संचालित असेल आणि व्यवसायाच्या वास्तविक आव्हानांना तोंड देण्यास सक्षम असेल. ही भागीदारी आम्हाला जागतिक संदर्भाची भारतीय संवेदनेशी सांगड घालण्याची संधी देते, जेणेकरून व्यवसाय अशा पद्धतीने भविष्याचे अनुमान करू शकेल, अनुकूलन करू शकेल आणि नेतृत्व करू शकेल जे या उद्योगाने यापूर्वी केलेले नाही.

# आरटेक स्टुडिओज आणि वंडरबार फिल्म्सची धनुष अभिनित डी५५ चित्रपटासाठी भागीदारी



आरटेक स्टुडिओज आणि वंडरबार फिल्म्स यांनी एकत्र येत डी५५ या संपूर्ण भारतभर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटावर काम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या चित्रपटात लोकप्रिय अभिनेता धनुष मुख्य भूमिकेत असून त्याचे दिग्दर्शन राजकुमार पेरियासामी करत आहेत. हा चित्रपट यावर्षाच्या शेवटी होणार आहे. ही भागीदारी दोन्ही प्रोडक्शन हाऊससाठी महत्वाकांक्षी आहे. चित्रपट मोठ्या स्तरावर सादर केला जाणार असून, त्यात स्पष्ट दृष्टिकोन आणि दमदार कथा यावर विशेष भर देण्यात येणार आहे. यासाठी अनुभवी आणि सक्षम क्रिएटिव्ह टीम एकत्र आली आहे.

आरटेक स्टुडिओजची स्थापना श्रद्धा अग्रवाल यांनी केली असून त्या या चित्रपटाच्या निर्मात्याही आहेत. या प्रोजेक्टमध्ये त्यांच्या सोबत मीडियाप्रेन्युअर अझमत जगमग आणि वंडरबार फिल्म्सचे श्रेयस श्रीनिवासन हेही सहभागी आहेत. तसेच या चित्रपटाचे सह-निर्मातेविश्वनाथन रामास्वामी आणि संदेश अग्रवाल आहेत.

श्रद्धा अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील आरटेक स्टुडिओज ही आर संदेश ग्रुपची सिस्टर कंपनी आहे. आर. संदेश ग्रुप हा मध्य भारतातील अग्रगण्य रिअल इस्टेट आणि मीडिया ग्रुप असून, त्याची स्थापना रामदेव (रम्मू) अग्रवाल आणि दिलीप अग्रवाल यांनी केली आहे. नागपूरशी घट्ट नाते आणि मोठे व्यवसाय उभारण्याचा वारसा लाभलेल्या या समूहाचा विस्तार श्रद्धा अग्रवाल यांनी आरटेक स्टुडिओजच्या माध्यमातून चित्रपट क्षेत्रात केला आहे. सलाम वेंकी या चित्रपटातून निर्माती म्हणून पदार्पण केल्यानंतर, डी५५ हा आरटेक स्टुडिओजचा तिसरा फीचर फिल्म प्रोजेक्ट असून कंपनीच्या सिनेमॅटिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

संयुक्त निवेदनात निर्माते श्रद्धा अग्रवाल आणि अझमत जगमग यांनी सांगितले, डी५५ हा चित्रपट आम्हाला रचनात्मक आणि महत्त्वाकांक्षी अशा दोन्ही दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. वंडरबार फिल्म्स, धनुष आणि राजकुमार पेरियासामी यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाल्यामुळे आम्हाला धाडसी आणि मजबूत कथाकथनावर आधारित कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवता येत आहे. डी५५ हा चित्रपट आरटेक स्टुडियोज़च्या मोठ्या स्तरावरील सादरीकरण, महत्त्वाकांक्षा आणि कथाकथन मूल्यांचे प्रतीक आहे आणि तो प्रेक्षकांसमोर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो.

आरटेक स्टुडिओज सध्या विविध विषयांवरील अनेक चित्रपटांवर काम करत असून, अनेक नवीन चित्रपट सध्या विकासाच्या टप्प्यात आहेत.





# स्कोडा ऑटोने भारतात नवीन कुशाक कार केली सादर

**नागपूर २३ जानेवारी :** स्कोडा ऑटो इंडिया ने नवीन कुशाक कार सादर केली आहे, जी मूल्य, सुरक्षितता आणि गतिशीलता यांची नवीन व्याख्या तयार करते आणि युरोपियन तंत्रज्ञानाला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या त्यांच्या धोरणाला पुढे नेते. कुशाक ही इंडिया २.० धोरणांतर्गत ब्रँडची पहिली कार असून या कारने भारतात कंपनीच्या वाढीला मोठी चालना दिली आहे. सगळ्यात नवीन आठ-स्पीडटॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक ट्रान्समिशन, रेअर सीट मसाज फंक्शन आणि इतर अनेक नवीन वैशिष्ट्ये व स्टँडर्ड उपकरणांसारख्या सेगमेंटमधील पहिल्या तंत्रज्ञानासह, नवीन कुशाक भारतीय रस्त्यांवर युरोपियन अभियांत्रिकी अधिक सुलभ बनवण्याच्या स्कोडा ऑटो इंडियाच्या धोरणाचे पालन करते.प्री-बुकिंग्आणि डिलिव्हरी स्कोडा ऑटो इंडियाच्या अधिकृत वेबसाइटवर नवीन कुशाक साठी १५,००० भरून बुकिंग करू शकता आणि ; डिलिव्हरी मार्च २०२६ च्या अखेरीस सुरू होईल

स्कोडा ऑटोचे सीईओ क्लॉस झेलमर म्हणाले, स्कोडा ऑटोच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये वाढ करण्याच्या धोरणासाठी भारत एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे,या गोष्टीवर अपडेटेड कुशाक शिक्कामोर्तब करते. कुशाक ने निर्यातीतून तिचे स्थान भारतातील ग्राहकांमध्ये आणि आसियान व मध्य पूर्वेकडील देशांमध्ये वेगाने निर्माण केले आहे. आता या मॉडेलच्या एकूण मूल्य प्रस्तावासाठी आम्ही पुढील मापदंड निश्चित करत आहोत. या अपडेटमध्ये मॉडर्न सॉलिड डिझाइन घटकांबरोबरच इन्फोटेनमेंट आणि ड्रायव्हर असिस्टन्सची विस्तृत वैशिष्टे समाविष्ट आहेत, ज्यामुळे अधिक आराम आणि सुरक्षितता मिळते. कोडियाक आणि कायलक यांच्यासोबत, स्कोडा ऑटो भारतीय बाजारपेठेत एसयूव्ही वाहनांचा एक असा ताफा सादर करत आहे, जो महत्त्वाच्या विभागांना आणि किमतींच्या श्रेणींना लक्ष्य करतो. कुशाक ला पुढील स्तरावर नेल्याने युरोपबाहेरील आमच्या सर्वात महत्त्वाच्या बाजारपेठेत अतिरिक्त मागणी आणि पुढील वाढीची संधी निर्माण होते.

आता कुशाक मध्ये एक अगदी नवीन फ्रंट ग्रिल देण्यात आली आहे, ज्यामध्ये क्रोम पट्ट्या आणि एक इल्युमिनेटेड लाइट बँड आहे. पुढच्या बाजूला पूर्णपणे नवीन एलईडी हेडलाइट्स, फ्रंट पार्किंग सेन्सर्स आणि एलईडी फॉग लॅम्प्स देखील आहेत. मागील बाजूस सिक्वेन्शियल टर्न इंडिकेटरसह नवीन कनेक्टेड टेललाइट्स देण्यात आले आहेत. ही एसयूव्ही आता तीन नवीन रंगांमध्ये उपलब्ध होईल शिमला ग्रीन, स्टील ग्रे आणि चेरी रेड, तसेच कँडी व्हाइट, कार्बन स्टील, ब्रिलियंट सिल्व्हर, लावा ब्लू आणि डीप ब्लॅक यांसारखे सध्याचे पर्यायही उपलब्ध असतील. पहिल्यांदाच, या व्हेरिएंटच्या वाढत्या मागणीनुसार, मोंटे कार्लो बॅज विक्रीच्या सुरुवातीपासूनच उपलब्ध करून दिला जाईल, ज्यामुळे गाडीच्या स्टाइलमध्ये आणखी भर पडेल.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. जर तुम्हाला आयुष्याच्या धावपळीत हरवलेले वाटत असेल, तर स्वत:साठी थोडा वेळ काढा आणि तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करा.

**वृषभ :** तुमच्या कुटुंबातील ज्येष्ठांकडून तुम्हाला काही प्रेरणा मिळेल. आज तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. व्यवसाय वाढवण्यासाठी नातेवाईक सूचना देतील.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य जाईल. अनावश्यक चिंतांपासून मुक्त होऊन तुम्ही मंदिर किंवा धार्मिक स्थळी वेळ घालवाल. आज सहलीला जाण्याची शक्यता आहे, तिथे जपून रहा, तब्येत सांभाळा

**कर्क :** विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु त्यांना अभ्यासात अधिक मेहनत घ्यावी लागेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवू शकाल, ज्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. मन समाधानी असेल.

**सिंह :** नवविवाहित जोडप्यांमध्ये आज गोड गप्पा होतील, ज्यामुळे त्यांच्या नात्यात आणखी गोडवा येईल. आज आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. नाहीतर मोठा फटका बसू शकतो.

**कन्या :** हॉटेल आणि रेस्टॉरंट्ससारख्या व्यवसायात गुंतलेल्या लोकांना आज चांगला नफा मिळेल. आज भरपूर कमाई होईल. चा दिवस जास्त नफा मिळवण्याचा आहे. तुम्हाला वडिलांकडून पाठिंबा मिळेल.

**तुळ :** आज कुटुंबात आनंदी वातावरण असेल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुसंवाद राखल्याने आनंद वाढेल. आज तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहाल. आज तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल.

**वृश्चिक :** आज तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील. तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल. तुमच्या चांगल्या वागण्यामुळे तुम्हाला समाजात चांगली प्रतिष्ठा मिळेल. आर्थिक लाभ होईल.


**धनु :** आज जपून रहा, तब्येत सांभाळा. व्यवसायासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. तुमचे काम व्यवस्थित पूर्ण होईल. आज तुमच्या दैनंदिन जीवनात काहीतरी नवीन येऊ शकते.

**मकर :** आज तुम्ही काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये संतुलन राखाल. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही नवीन मार्गांचा विचार कराल. तुमच्या जवळच्या नातेवाईकांकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळेल.

**कुंभ :** आज, रखडलेले व्यावसायिक प्रकल्प पुन्हा सुरू केल्याने तुमची व्यस्तता वाढेल. आज नेमलेली कामे वेळेवर पूर्ण करा, अन्यथा वरिष्ठांकडून ओरडा ऐकावा लागू शकतो.

**मीन :** दिवसभर तुम्हाला ताजेतवाने वाटेल. तुमच्याभोवती सकारात्मक ऊर्जा असेल. लोक तुमच्या वागण्याने खूश होतील. आज तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे.

# शब्दकोडे क्रमांक २३३५



**आडवे शब्द :-**

१) एकमेकावर अवलंबून असणे
७) सांप्रत दिवस
९) सूर्याचे एक नाव
११) ढीग
१२) करपलेला भाग
१३) पालिकेतील लोकप्रतिनिधी
१५) देवाला निरांजनाने ओवाळताना म्हणावयाचे स्तुतीगीत
१६) ठोक! हाण!
१७) वस्त्र
१८) हावरटपणा
२०) माळ (हिं)
२१) भावाची पत्नी
२२) मोठी बहीण.
२३) आठवण
२४) धक्का, अनर्थ (हिं.)
२५) लेखणी
२७) वजन, बोजा
२८) निवासस्थान
३०) फुटकी कवडी
३३) श्रीकृष्णाचे एक नाव
३५) बोकड
३६) गूळ-साखरेचा रस
३७) उत्तराधिकारी
३८) दुलई ४०) तलाव
४१) प्राप्ती
४२) श्वासोच्छ्वास
४३) हाताचा तळवा
४६) शेवटच्या श्वासांचा आवाज
४७) एक रंग
४८) निरर्थक बडबड
४९) आकाश
५१) मालक
५२) पंकज
५३) आयुष्य, पाणी
५५) सुसंस्कृत
५७) टवाळकी करणारा
५८) पावसाची धार
६०) बातमीचे शीर्षक
६१) कावळा
६२) सरळ वासा
६३) गणपती

**उभे शब्द :-**

१) पराजय
२) द्रव पदार्थ
३) मीठ
४) खालतीच्या विरुद्ध
५) जंगली फुलांची माळ
६) शहर, गाव
७) हिंदी महासागरापासून हिमालयापर्यंत
८) सातू
१०) आकाशयान
१४) मिठी
१५) अफवा
१९) एक तारवाद्य
२०) आई (ग्रा.)
२१) चेहरा, मुख
२३) टोळीचा प्रमुख
२५) मनाचा ओढा
२६) भ्रमर
२७) हमाल
२९) जेवण
३१) चर्मासन
३२) व्यायाम
३४) पराग, मातीचा कण
३६) पर्जन्यकाळ
३९) परमेश्वर
४१) लघळपणा, पाल्हाळ
४४) चंद्र
४५) चटकन, त्वरित
४७) चिंता
४९) सुस्ती
५०) अंत:करण
५२) शिखराचे टोक
५४) वागणूक
५६) घसा, अन्नमार्ग
५७) एकाग्र नजर
५९) मस्ती, जोम.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# एमआयएमसोबत कधीही युती नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



अचलपूरमध्ये भाजपचे केवळ ९ उमेदवार निवडून आले आहेत. बाकी सर्व नगरसेवक हे उबाठा, काँग्रेस, एमआयएमचे निवडून आले आहेत, त्यांनी आपआपले गट स्थापन केले आहेत, भाजपच्या गटात ना काँग्रेस आहे ना एमआयएम आहे, तिथे वेगवेगळ्या पक्षांनी तिथे आपला गट केलेला आहे, आम्ही तिथे अल्पमतात आहोत, त्यामुळे तिथल्या इतर पक्षांनी गट स्थापन करत सभापतीपद वाटून घेतले आहेत, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले की, भाजप एमआयएमला कधीही सोबत घेणार नाही. भाजपचा आणि एमआयएमचा काहीही संबंध नाही हे अचलपूरच्या अध्यक्षांनी देखील स्पष्ट केले आहे. नगरसेवक हे स्थानिक विकास आघाडी बनवताना कुठल्या ना कुठल्या गटात जात असतात. कल्याणमध्ये स्थानिक लेव्हलवर काय निर्णय झाला हे माहिती नाही. मनसेने काय निर्णय घेतला, एकनाथ शिंदेंनी काय निर्णय घेतला हा त्यांच्या पक्षाचा अधिकार आहे. पण महायुतीची चर्चा सुरू आहे त्यातच महापौर पदाचे अंतिम होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बावनकुळे म्हणाले की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी विचार केला पाहिजे की त्यांची लोकं कुणासोबत जात आहेत. पण आम्ही भाजप सेना युतीमध्ये लढलो आहोत. आम्ही तिथे सरकार बसवू. आमचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा तो मतदारसंघ आहे तिथे भाजप-सेना महायुती म्हणूनच तिथे निर्णय होईल. मला वाटते दुसरा विचार करण्याची गरज नाही.

बावनकुळे म्हणाले की, जिल्हा परिषदेमध्ये १० सदस्यामागे एक स्वीकृत सदस्य आणि पंचायत समितीमध्ये ५ सदस्यामागे १ स्वीकृत सदस्य रहावेत, आणि ग्राम विकास अधिनियमात थोडी सुधारणा करावी अशी विनंती मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना केली होती. ह मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक पद्धतीने मागणीला प्रतिसाद दिला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# उच्च न्यायालयाने घेतली वाघांच्या मृत्यूंची दखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

यंदा जानेवारीच्या पहिल्या काही दिवसातच राज्यात चार वाघ मृत्युमुखी पडले. २०२५ मध्येही पहिल्याच महिन्यात अवघ्या २२ दिवसात ११ वाघ मृत्युमुखी पडले होते.

वाघ मृत्यूंच्याबाबत राज्य देशात दुसऱ्या स्थानावर आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने याप्रकरणी ॲड.चैतन्य ध्रुव यांची न्यायालयीन मित्र म्हणून नियुक्ती करत याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले.

राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष गंभीर झाला आहे. वाघाच्या हल्ल्यात मानवी मृत्यूची संख्या वाढत असतानाच वाघांच्या मृत्यूची संख्याही वाढत आहे. २०२५ मध्ये वाघांच्या मृत्यूत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर होता. तर आताही पहिल्या १२ दिवसात काही वाघांचे मृत्यू समोर आले.



३१ डिसेंबर २०२५ ला वर्धा जिल्ह्यातील सेलू मुरपाड येथे वाघिणीच्या मृत्यूची घटना उघडकीस आली. एका वाघाचा शेतातील जिवंत विद्युत कुंपणाला लागून मृत्यू झाला होता आणि त्याचा मृतदेह पुलाखालील पाणवठ्यात टाकण्यात आला.

या घटनेला १३ दिवस लोटले, पण कुणालाही अटक झालेली नाही. त्यानंतर सात जानेवारीला पेंच व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत देवलापार परिसरात वाघाच्या आठ ते नऊ महिन्यांच्या दोन बछड्यांचा मृत्यू झाला.

प्रादेशिक वर्चस्वासाठी झालेल्या लढाईत हा मृत्यू झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी दर्शवण्याचा प्रयत्न केला.

प्रत्यक्षात या घटनेत या दोन्ही बछड्यांचा मृत्यू वाहनाची धडक लागून झालेला असण्याची दाट शक्यता आहे. त्यानंतर रविवार, ११ जानेवारीला चंद्रपूर वनविभागातील पायली-भटाळी परिसरात चिंचोली गावाजवळ इरई नदीच्या पात्रात सुमारे दोन वर्षाची वाघीण मृतावस्थेत आढळली.

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या जवळ हा परिसर असून या वाघिणीचा मृत्यू देखील दोन ते तीन दिवसांपूर्वी झाला असावा. ही वाघीण शेताभोवती बेकायदेशीरपणे लावलेल्या विद्युत कुंपणाला स्पर्श झाल्याने विद्युतदाबाने ठार झाली. त्यानंतर पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह इरई नदीत फेकून देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे एक कार्यालय नागपुरात असतानादेखील वाघांचे मृत्यू व त्यानंतरचे तपासकार्य गांभीर्याने घेण्यात आले नाही. त्यांनाही या घटनांची योग्य माहिती पुरवली जात नाही की प्राधिकरणच गंभीर नाही, असा प्रश्न या मृत्यूनंतर उपस्थित झाला आहे.

यापूर्वीही भंडारा आणि गोंदिया जिल्ह्याच्या विविध भागात काही वाघांची शिकार आणि अन्य कारणांमुळे त्यांचे मृत्यू झाल्याच्या घटना अनेकदा समोर आल्या आहेत . दरम्यान, न्यायालयातील याचिकेवर पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होणार आहे.

# तर भाजपला कोणी विचारलंही नसतं...

## विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २३ :



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूरमधील राजकीय घडामोडी, हिंदुत्वावरची भूमिका, बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणी आणि बदलापूरमधील बालिकेवरील अत्याचार प्रकरण या तिन्ही मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांवर तीव्र टीका केली.

चंद्रपूर महानगरपालिकेतील सध्याच्या वादावर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केलं की, आजच महापालिकेत गट स्थापन होणार असून गटनेताही निश्चित झाला आहे. चंद्रपूरच्या विकासासाठी आणि नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेस आणि मित्रपक्ष ठामपणे काम करणार असल्याचं त्यांनी ठणकावून सांगितलं. महापौर कोण होणार, स्थायी समितीची रचना कशी असेल, यासंदर्भातील सर्व निर्णय आधीच झाले असून संध्याकाळपर्यंत संपूर्ण चित्र स्पष्ट होईल, असा विश्वास वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

वडेट्टीवार म्हणाले की, केवळ सत्तेसाठी नव्हे तर शहराच्या विकासासाठी काँग्रेसची भूमिका स्पष्ट आहे. नागरिकांचे मूलभूत प्रश्न, पायाभूत सुविधा, रोजगार आणि शहराच्या एकूण प्रगतीसाठी आम्ही काम करणार आहोत. महापौरपदाबाबतही कोणतीही अनिश्चितता नाही. योग्य निर्णय झाला असून आज संध्याकाळपर्यंत चंद्रपूरचा नवा महापौर कोण असेल, हे स्पष्ट होईल. स्थायी समितीबाबतही निर्णय अंतिम टप्प्यात असल्याचं त्यांनी सांगितलं. सत्ताधाऱ्यांकडून केवळ संभ्रम निर्माण केला जात असून प्रत्यक्षात चित्र वेगळंच आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा देताना वडेट्टीवार भावुक झाले. काँग्रेसमध्ये येऊन आपल्याला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याचं सांगताना सुरुवातीच्या काळात बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत काम केल्याची आठवण सांगितली. बाळासाहेबांनी कधीही जात, पात, धर्म यावरून भेदभाव केला नाही, असं स्पष्ट मत त्यांनी मांडलं.

त्यांचं हिंदुत्व हे बेगडी नव्हतं, ते देशासाठी होतं. त्यांच्या नेतृत्वामुळेच देशात भाजपला चांगले दिवस आले आणि ते सत्तेत आले, असा दावा करत वडेट्टीवार म्हणाले की, बाळासाहेबांचा पाठिंबा नसता तर भाजपला कोणी विचारलंही नसतं.

# शिवानी दाणीसह जिचकार, मोहोड ठाकरे, यादव यांची नावे चर्चेत!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी गुरुवारी आरक्षणाची सोडत जाहीर झाली. सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी महापौरपद आरक्षित झाले आहे. या निर्णयानंतर शहराच्या राजकारणात हालचालींना वेग आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील शिवानी दाणी, अश्विनी जिचकार आणि विशाखा मोहोड, प्रभाग २८ मधील निताताई राजेंद्र ठाकरे यांच्यासह लक्ष्मीताई यादव यांची नावे महापौरपदासाठी आघाडीवर असल्याची चर्चा आहे.

महापौरपदासाठी चर्चेत असलेल्या शिवानी दाणी (प्रभाग ३६), अश्विनी जिचकार (प्रभाग ३७) आणि विशाखा मोहोड (प्रभाग ३५) या तिन्ही नगरसेविका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. विशेष म्हणजे मागील २०१७ मध्येही भाजपची सत्ता स्थापन होताच सर्वप्रथम फडणवीस यांच्या मतदारसंघालाच महापौरपद मिळाले होते. त्यामुळे यावेळीही त्याच मतदारसंघातील महिला नगरसेविकेला संधी दिली जाईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.



याशिवाय भाजपच्या ज्येष्ठ आणि अनुभवी नगरसेविका नीता ठाकरे, दिव्या धुरडे, मंगला खेकरे आणि साधना बरडे यांची नावेही संभाव्य महापौर म्हणून पुढे येत आहेत. संघटनात्मक अनुभव, प्रशासनाशी समन्वय आणि पक्षातील ज्येष्ठत्व या मुद्द्यांवर या नावांचा गांभीर्याने विचार होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

प्रभाग १६ मधील लक्ष्मी यादव या महापौरपदाच्या प्रबळ दावेदार म्हणून पाहिले जात आहे. त्या दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. संघटनात्मक अनुभव आणि पक्षातील ज्येष्ठत्व या मुद्द्यांवर त्यांच्या नावाचा विचार होण्याची दाट शक्यता आहे. राज्यात आणि नागपूर शहरातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीच भूमिका निर्णायक ठरणार असल्याने, अंतिम निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## चंद्रशेखर पाखमोडेंना रविवारी श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा यांच्यातर्फे रविवार २५ जानेवारीला स्व. कुसुमताई बाबुरावजी झाडे सभागृह नवप्रतिभा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आयुर्वेदिक ले आउट सक्करदरा नागपूर येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर शहरातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे ३१ डिसेंबरला निधन झाले होते. सभेत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जाईल. याप्रसंगी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी खासदार रामदास तडस यांची प्रमुख उपस्थिती राहील. या कार्यक्रमाला आ. कृष्णा खोपडे, शेखर सावरबांधे, तेली समाज सभेचे अध्यक्ष नानाभाऊ ढगे, डॉ. कुणाल पडोळे, डॉ. राजेश सावरबांधे, डॉ. चंद्रशेखर गिल्लुरकर आणि राजेंद्र झाडे उपस्थित राहतील.

# दारूसाठी पतीने पत्नीला जिवंत जाळले

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २३ :

नातेवाईकांचा विरोध झुगारून ज्याच्याशी प्रेमविवाह केला, त्याच पतीने दारूसाठी पैसे दिले नाहीत म्हणून पत्नीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला जिवंत जाळल्याची घटना तालुक्यातील पोर्ला येथे उघडकीस आली आहे. महिनाभर मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर नागपूर येथे उपचारादरम्यान या पत्नीची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे दोन चिमुकल्या मुली आई-वडिलांच्या प्रेमाला पारख्या झाल्या आहेत.

प्रियांका सुशील बारसागडे (२६) असे मृत महिलेचे नाव असून ती मूळची चंद्रपूर जिल्ह्यातील निलसनी पेडगाव (ता. सावली) येथील होती. २०१८ मध्ये प्रियांका आणि सुशीलने कुटुंबीयांचा विरोध डावलून प्रेमविवाह केला होता. सुरुवातीला त्यांचा संसार सुखाचा सुरू होता, मात्र सुशीलला दारूचे व्यसन जडल्याने त्यांच्या संसारात वादाची ठिणगी पडली. १६ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ५ च्या सुमारास सुशीलने दारूसाठी प्रियांकाकडे पैशांची मागणी केली. तिने नकार देताच सुशीलने तिला बेदम मारहाण करत कपाटातील दोन हजार रुपये हिसकावून नेले.

काही वेळाने सुशील पुन्हा घरी परतला, तेव्हा प्रियांका स्वयंपाकघरात कामात व्यस्त होती. रागाच्या भरात असलेल्या सुशीलने मागून येत प्रियांकाच्या अंगावर पेट्रोल ओतले आणि तिला पेटवून दिले.

प्रियांकाने जीवाच्या आकांताने आक्रोश केला, तर तिच्या पाच वर्षीय मुलीनेही हंबरडा फोडला. हा आवाज ऐकून शेजारी धावून आले, तोपर्यंत प्रियांका ४० ते ५० टक्के भाजली होती. आपले पाप लपवण्यासाठी सुशीलने स्वतःच तिच्या अंगावर चादर टाकून आग विझवण्याचा बनाव केला.

प्रियांकावर सुरुवातीला जिल्हा रुग्णालयात आणि त्यानंतर नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार करण्यात आले. प्रकृती खालावल्याने तिला खासगी रुग्णालयात हलवण्यात आले होते, मात्र २० जानेवारी रोजी तिची मृत्यूशी झुंज संपली.

मृत्यूशी झुंज देत असताना प्रियांकाने आपले वडील अशोक बोलदवार यांच्याकडे पतीच्या क्रूर कृत्याचा पाढा वाचला. वडिलांच्या फियार्दीवरून गडचिरोली पोलिसांनी आरोपी सुशील चिंटूजी बारसागडे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे.

# सेवाग्राम ओबीजीवाय सोसायटीला फिरता चषक







■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २३ :

दिल्ली येथे आयोजित एआयसीओजी (All India Congress of Obstetrics and Gynaecology) या राष्ट्रीय अधिवेशनात सेवाग्राम ऑब्स्टेट्रिक अँण्ड गायनॅकोलॉजी सोसायटीला वर्ष २०२४-२०२५ साठीचा फोगसी (FOGSI - FEDERATION OF OBSTETRICS AND GYNAECOLOGY SOCIETY OF INDIA) अध्यक्षांचा फिरता चषक प्रदान करण्यात आला.

सध्या भारतात एकूण ४२५ स्त्रीरोगतज्ज्ञ सोसायटी कार्यरत असून, त्यापैकी कॅटेगरी क मध्ये ८७ सोसायटींची नामांकने प्राप्त झाली होती. या कठीण व स्पर्धात्मक प्रक्रियेतून सेवाग्राम ओबीजीवाय सोसायटीची निवड होऊन हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळाल्याने वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भाचा गौरव वाढला आहे.

हा पुरस्कार सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. पुनम वर्मा व सचिव डॉ. शिल्पा राऊत यांच्या सक्षम व दूरदर्शी नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी देण्यात आला. मातृ आरोग्य, महिलांचे सर्वांगीण आरोग्य, सुरक्षित मातृत्व, जनजागृती उपक्रम, सामाजिक आरोग्य सेवा तसेच डॉक्टरांसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात सोसायटीने सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य केले आहे.

ग्रामीण व शहरी भागातील महिलांपर्यंत दर्जेदार स्त्रीरोग सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने सेवाग्राम ओबीजीवाय सोसायटीने राबवलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय परिषदेत सचिव डॉ. शिल्पा राऊत आणि एचओडी डॉ. शुची जैन यांना प्रदान करण्यात आला. भविष्यातही महिलांच्या आरोग्यासाठी अधिक प्रभावी उपक्रम राबवण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# पशुवैद्यकीय शिक्षणाची आबाळ

लोकरंग



राज्यामध्ये महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ ३ डिसेंबर २००० मध्ये स्थापन करण्यात आले होते. म्हणजेच या विद्यापीठाचा रौप्य महोत्सव साजरा होत आहे. राज्यात सहा पशुवैद्यकीय महाविद्यालय,तीन मत्स्य महाविद्यालय,दोन दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय आणि चार पशु पैदास प्रक्षेत्र आहेत. या सर्व महाविद्यालयातून सुमारे २००० भावी पशुवैद्यक शिक्षण घेत आहेत. मात्र,सध्या प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे या महाविद्यालयातीतील शिक्षणाची आबाळ होत आहे. याच अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाचे सेवानिवृत्त सहायक आयुक्त डॉ. व्यंकटराव घोरपडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**महाराष्ट्रातील पशुवैद्यकीय महाविद्यालयांची सद्यस्तिथी नेमकी काय आहे?**

○ २६ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या बिंदू नामावली प्रमाणे विद्यापीठामध्ये एकूण मंजूर सहयोगी प्राध्यापकांच्या १९४ जागांपैकी फक्त ५४ पदे भरलेली आहेत. याशिवाय इतर कार्यालयीन कर्मचाऱ्यांची पदे जवळपास ८५ टक्के रिक्त आहेत. पशुवैद्यकीय महाविद्यालयांचा विचार केला तर एकूण प्राध्यापकांच्या मंजूर पदापैकी ६४ पदे हि पदोन्नतीने भरावयाची आहेत. परंतु हि सर्व पदे रिक्त असल्याचे समजते.

जवळजवळ ७० टक्के प्राध्यापक आणि ८५ टक्के कार्यालयीन कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

**प्राध्यापकांच्या भरती अभावी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर काय परिणाम होतो आहे?**

○ हा प्रश्न केवळ आकडेवारीचा नाही तर या हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे. प्राध्यापकांशिवाय विद्यापीठ चालवणे कोणाच्याही हिताचे नाही. त्यामुळे अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी लागणारे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे विद्यापीठातील शिक्षण हे अर्धवट राहणार आहे.

विषय हा प्राध्यापकांच्या नोकरीचा नसून विद्यार्थ्यांच्या हक्काचा आहे. राज्यात अनेक पदवीधर हे नेट सेट उत्तीर्ण आहेत. पीएचडी पदवीधारक आहेत मात्र तरीही हि रिक्त पदे भरली जात नाहीत हि शोकांतिकाच आहे.

**याबाबत राज्यकर्ते उदासीन आहेत का? त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत?**

○ अलीकडे राज्यकर्ते शिक्षणावर केलेली तरतूद म्हणजे अनावश्यक खर्च समजू लागले आहेत. खार तर हि गुंतवणूक आहे. हे त्यांच्या लक्षात येत नाही. मोफत योजनांच्या नादात आर्थिक नियोजन ढासळते आहे. आणि मग काटकसर धोरणाची आत्मघातकी अंमलबजावणी सुरु होते. शैक्षणिक क्षेत्रात अशा प्रकारे दुर्लक्ष योग्य नाही . त्यासाठी रिक्त पदे वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने भरावी लागतील. मजूर पदांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी लागेल. अतिरिक्त कार्यभार देखील किती काळ ठेवावा याबाबत कायदेशीर तरतुदी कराव्या लागतील. विद्यापीठांची स्वायत्तता पुन्हा स्थापित होणे गरजेजेचे आहे. ■ ■ ■

# वर्ल्ड ट्रेड सेंटर तर्फे व्हिंटेज, क्लासिक आणि मॉडर्न क्लासिक कार फिएस्टा २०२६ आयोजन

या वर्षी वर्ल्ड ट्रेड सेंटर वार्षिक व्हिंटेज, क्लासिक आणि मॉडर्न क्लासिक कार फिएस्टा २०२६ च्या ५ व्या आवृत्तीचे आयोजन करणार आहे ज्याचे उद्घाटन समारंभ २४ जानेवारी २०२६ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक दर्शनासाठी राखीव ठेवण्यात आले आहे, त्यानंतर २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी औपचारिक झेंडा दाखवण्यात येईल.




या फिएस्टाचे उद्दिष्ट सडक सुरक्षा, जीवन रक्षा या संदेशाला बळकटी देणे आहे. हा कार्यक्रम डब्ल्यूटीसीद्वारे व्हीसीसीआय आणि डब्ल्यूआयएए यांच्या सहकार्याने आयोजित केला जात आहे, असे डॉ. विजय कलंत्री, अध्यक्ष, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई आणि अध्यक्ष ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज यांनी मुंबईतील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे होणाऱ्या आगामी कार्यक्रमाबद्दल माध्यमांना सांगितले.

गेल्या वर्षी १ लाखाहून अधिक अभ्यागत होते आणि यावर्षी देखील सर्व स्तरातील लोक, मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंतचा उत्साह पाहता या दुर्मिळ प्रदर्शनाला भेट देण्याची अपेक्षा आहे. हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. कारण आम्हाला वाटते की विंटेज कारचा हा वारसा भावी पिढ्यांसह सामायिक केला पाहिजे आणि मुंबईचे एक क्लासिक शहर म्हणून सांस्कृतिक महत्त्व देखील अधोरेखित केले पाहिजे, असे डॉ. कलंत्री यांनी नमूद केले.

याप्रसंगी बोलताना व्हीसीसीआय आणि डब्ल्यूआयएएचे अध्यक्ष नितीन डोसा यांनी त्यांच्या संग्रहाचे संकेत दिले जे १९३३ चे हडसन आहे, जे जगभरात अशा प्रकारचे एकमेव जिवंत उदाहरण मानले जाते, जे जागतिक ऑटोमोटिव्ह इतिहासाचे एक दुर्मिळ आणि अमूल्य अध्याय दर्शवते. डोसा यांनी माध्यमांना या कार्यक्रमाची माहिती देखील दिली. ■ ■ ■

## चला पर्यटनाला

# जयपूर मधील जलमहाल आणि हवा महल

जयपूर शहर, गुलाबी शहर म्हणून प्रसिद्ध, राजस्थानची राजधानी आहे आणि विविध आकर्षणांसाठी ओळखले जाते.

जयपूरच्या दोलायमान शहरामध्ये शाही भव्यता आणि वास्तुशास्त्रीय भव्यतेपासून ते स्ट्रीट फूड आणि रंगीबेरंगी बाजारपेठांपर्यंत अनेक गोष्टी आहेत. जयपूरमधील जलमहाल (वॉटर पॅलेस) तलावाच्या पृष्ठभागावर तरंगत असल्याचा भ्रम देतो. स्थापत्यशास्त्राचा चमत्कार, हा राजपूतांच्या अभियांत्रिकी पराक्रमाचा पुरावा आहे.



हा एक पाच मजली वाडा आहे जिथे चार मजले पाण्याखाली आहेत. जलमहाल राजस्थानी आणि मुघल स्थापत्यकलेचे मिश्रण करते. मनसिंग सरोवरात नौकाविहार करून विलोभनीय दृश्य पहा.

मधाच्या पोळ्याच्या आकारात बनवलेला हवा महाल जयपूरचा खूण आहे. 'पॅलेस ऑफ विंड्स' म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या, ही पाच मजली इमारत 1799 मध्ये महाराजा सवाई प्रताप सिंग यांनी राजेशाही महिलांसाठी दैनंदिन जीवन आणि रस्त्यावरील उत्सव पाहण्यासाठी बांधली होती, कारण त्यांना पांघरूण न घेता सार्वजनिक देखावा करण्याची परवानगी नव्हती त्यांचे चेहरे.

या राजवाड्यात 953 खिडक्या किंवा चरखे आहेत, जे किचकट डिझाईन्सने सुशोभित आहेत. हवा महल संकुलातील एका संग्रहालयात लघुचित्रे आणि औपचारिक चिलखत यासारख्या प्रसिद्ध वस्तू आहेत. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## तिसरे मराठी गझल संमेलन अमरावतीत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २३ :

महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक गजलकारांच्या उपस्थितीत आगामी ७ व ८ फेब्रुवारीला अमरावतीत अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन येथील श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहात होईल. संमेलनाचे यजमानपद सुरेश भट प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर प्रतिष्ठानने स्वीकारले आहे.

सदर संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध गजलकार सीए नाना लोडम यांची निवड करण्यात आली आहे. या आयोजनाबाबत लोडम यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, प्रसिद्ध कवी व गजलकार वैभव जोशी हे या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष असून उद्घाटन डॉ. राम पंडित (मुंबई) यांच्या हस्ते केले जाईल. यावेळी शाहीर सुरेशकुमार वैराळकर पुणे, दगडू दादा लोमटे अंबाजोगाई, संतोष बोरगावकर, डॉ. गणेश गायकवाड, शिवाजी जवरे, निवृत्त माहिती महासंचालक डॉ दिलीप पांढरपट्टे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

# शिंदेंनी उद्धव ठाकरेंना पाठिंबा द्यावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई दि. २३ :



शिवसेना उबाठाचे आमदार भास्कर जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबईला शिवसेनेचा महापौर देण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. यंदाचे वर्ष हे बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीचे आहे. पण याचवर्षी बाळासाहेबांच्या शिवसेनेचा महापौर मुंबई महापालिकेवर असणार नाही याचे प्रचंड दुःख आहे. शिंदेंनी राग, लोभ बाजूला ठेवून मुंबईत उद्धव ठाकरे यांच्या महापौरपदाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला पाहिजे, असे ते म्हणालेत.

## काहीही होऊ शकते

याविषयी मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, आता दोन्ही भाऊ (राज व उद्धव ठाकरे) एकत्र आलेत. प्रत्येकाचा एक विचार आहे. राजकारणात कधीही आणि काहीही होऊ शकते. कोण कधी कुणासोबत जाईल हे सांगता येत नाही. या विधानाची चर्चा आहे.

## प्रवीण परदेशी यांच्या नियुक्तीला मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई दि. २३ :

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन अर्थात 'मित्र' या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या नियुक्तीला राज्य सरकारने तीन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. नियोजन विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला.

नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात 'मित्र' या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर प्रवीण परदेशी यांची तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली होती.

**पाहिजेत**

आनंद शिक्षण संस्था आरमोरी द्वारा संचालित

**गुरूदेव वसतिगृह कराडी, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली**

(अनुदानित)

(समाजकल्याण अधिकारी यांचे परवानगी पत्र क्र./ जिपग/सकवि/अनु.वस्ती./पदमान्यता/४३/२०२६ दिनांक २२/०१/२०२६ नुसार )

गुरूदेव वसतिगृह कराडी, येथील रिक्त चौकीदाराचे पद भरावयाचे आहे.

| पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | वेतन/मानधन |
|---|---|---|
| चौकीदार (१) पुरूष | ७ वी पास | शासकीय नियमानुसार मानधन तत्वावर |

तरी पात्र उमेदवारांनी आपल्या मुळ प्रमाणपत्रासह दि. ०३/०२/२०२६ रोज मंगळवारला स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीसाठी महात्मा फुले विद्यालय, कराडी ता. कुरखेडा जि. गडचिरोली येथे स.११.०० वा. उपस्थित राहावे.

प्रा.डॉ. शशिकांत बुधाजी गेडाम
अध्यक्ष
आनंद शिक्षण संस्था आरमोरी

श्री. अजय बुधाजी गेडाम
सचिव
आनंद शिक्षण संस्था आरमोरी